CMYK

## मुंबईचा मोठा विजय, ग्रीनची तुफानी खेळी

मुंबई : करो या मरो सामन्यात मुंबई इंडियन्सने मोठा विजय साकारला आणि त्यांनी प्ले ऑफच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकले आहे. हैदराबादच्या २०१ धावांचा पाठलाग करताना रोहित शर्मा आणि कॅमेरून ग्रीन यांनी अर्धशतकं झळकावली, त्यामुळेच मुंबईच्या संघाला विजय मिळवता आला. हैदराबादच्या २०१ धावांचा पाठलाग करताना मुंबईला इशान किशनच्या रुपात पहिला धक्का बसला, त्याला १४ धावा करता आल्या. पण इशान बाद झाला आणि त्यानंतर कॅमेरून ग्रीन आणि रोहित शर्मा यांची चांगलीच जोडी जमल्याचे पाहायला मिळाले. ग्रीन यावेळी रोहितपेक्षा जास्त आक्रमक होता आणि त्यामुळेच त्याने रोहितनंतर येऊनही त्याच्यापूर्वी आपले अर्धशतक झळकावले.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

क्वालिफायर क्र.१

GUJARAT TITANS Vs CHENNAI SUPER KINGS

गुजरात विरुद्ध चेन्नई

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : चिदंबरम स्टेडियम

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २२ मे २०२३ | वर्ष : २१ वे अंक : २३२ वा किंमत : ५ रुपये पाने ८

# इथे कुणीही 'भुट्टा' येईल, लक्ष देऊ नका!

## काँग्रेस मेळाव्यात नाना पटोलेंचा सल्ला : माढा लोकसभेवर दावा : स्वबळाची भाषा

सुराज्य/सोलापूर

**देशाच्या राजकारणात जर सुशीलकुमार शिंदे हवे असतील आणि आमदार प्रणिती शिंदे यांना जर कॅबिनेट मंत्रीपदी बघायचे असेल तर सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा आणि सोलापूर लोकसभेसह माढा लोकसभा ही जिंका तरच हे शक्य होईल, मला राहुल गांधी यांना पंतप्रधान करायचे आहे, असे सांगून प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी, इथे कुणीही 'भुट्टा' येईल आणि काहीही सांगून जाईल, त्यांच्याकडे अजिबात लक्ष देऊ नका, असा सल्ला काँग्रेसजनांना दिला.**



काँग्रेस पक्षाचा महानिर्धार मेळावा रविवारी हुतात्मा स्मृती मंदिरात झाला. यावेळी नाना पटोले बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप, आ. नसीम खान, आ. प्रणिती शिंदे, माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे, विश्वनाथ चाकोते, अस्लम शेख, शहराध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, वरिष्ठ जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे व्यासपीठावर उपस्थित होते.

नाना पटोले म्हणाले की, सुशीलकुमार शिंदे हे खासदार असले पाहिजेत, असं तुम्ही म्हणतात. पण, मी निवडणूक लढायला तयार नाही, असे मला त्यांनी सांगितले. तुमची इच्छा असेल तर ते निवडणुकीला उभे राहतीलही. पण या निवडणुकीत ते बहुमताने निवडून आले पाहिजेत. ही जबाबदारी तुम्हाला घ्यायची आहे. त्या माणसाचा मी अपमान होऊ देणार नाही. ते दोन वेळ पराभूत झाले आहेत. त्यामुळे सोलापूर दहा नाही तर पन्नास वर्षांनी मागे गेले आहे. मला सोलापूर लोकसभेची जागा तर जिंकायचीच आहे. पण त्याबरोबरच माढ्याची जागाही जिंकायची आहे. कारण, मला राहुल गांधी यांना पंतप्रधान करायचे आहे. त्यामुळे मला तुमची हमी हवी आहे. प्रत्येकाने मी सुशीलकुमार शिंदे उभे आहोत, असे समजून काम केले पाहिजे. आ. प्रणिती शिंदे यांना मंत्री करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व अकरा आमदार निवडून आणण्याची जबाबदारी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

भाजपवर टीका करताना पटोले म्हणाले की, केंद्र सरकार हे बनिया सरकार आहे. महागाई दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यावरून लक्ष हटवण्यासाठी विविध मुद्दे उपस्थित करत लोकांचे लक्ष वेगळीकडेच विचलित करण्यात येते.

आज लोकांची पसंती काँग्रेसला आहे हे कर्नाटक वरून सिद्ध झाले आहे. त्यामुळे कोणाच्या बोलण्याकडे काही लक्ष देऊ नका, असेही पटोले म्हणाले. यावेळी चेतन नरोटे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी भाजपचे माजी शहराध्यक्ष प्रा. अशोक निंबर्गी यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. नाना पटोलेंसह मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले.

### प्रत्येकाच्या कामाचे पोस्टमार्टम होणारः पटोले

सर्वांनी ऍक्टिव्ह राहून काम करावे, हवेत कोणीही राहू नये. मला खुर्ची मिळाली आहे आता माझे कोणी काही करू शकत नाही अशी वृत्ती काढून टाका. सर्वांच्या कामाचे पोस्टमार्टम होणार आहे. पक्षात ज्येष्ठ-कनिष्ठ असा कोणताही भेदभाव करू नका, खुर्चीला नमस्कार करा आज जो लहान कार्यकर्ता आहे कदाचित तो काम चांगले केल्यावर मोठा होऊन त्यालाही खुर्ची मिळेल. आपल्याला महापालिकेबरोबरच आपल्याला लोकसभा आणि विधानसभा ही जिंकायची आहे, असे पटोले म्हणाले.

### मोदी गोंधळलेल्या अवस्थेत : चव्हाण

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान मोदी हे गोंधळलेल्या अवस्थेत दिसत आहेत. प्रत्येक निवडणुकीत जात आणि धर्म काढायचे आणि निवडणूक जातीपतीच्या व्यवस्थेवर जिंकायची ही भाजपची नीती आता लोकांनी हाणून पाडली आहे. राहुल गांधी यांना ज्याप्रमाणे त्रास देण्यात आला त्याचे उत्तर कर्नाटक निवडणुकीत जनतेने दिले आहे. नरेंद्र मोदी यांना २०२४ मध्ये जनता त्यांच्याच भाषेत उत्तर दिल्याशिवाय राहणार नाही.

### हा काँग्रेसचा विजयी मेळावाः थोरात

आजचा काँग्रेसचा निर्धार मेळावा नाही तर विजयी मेळावा आहे. कर्नाटकच्या विजयाने सुरू केलेला काँग्रेसचा विजयी पतका २०२४ पर्यंत कायम ठेवायचा आहे. हाच उत्साह शेवटपर्यंत कायम ठेवावा, असे सांगत माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, शिंदे यांचे काम संपूर्ण देशाने पाहिले आहे. त्यांनी आता वयाचे कारण सांगून राजकारणापासून लांब जाणे न पटणारे आहे.

### भाजपबद्दल जनतेच्या मनात चिड : शिंदे

माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे म्हणाले की, भाजपबद्दल लोकांमध्ये प्रचंड चीड आहे. ती कर्नाटक निवडणुकीच्या निमित्ताने सर्वांसमोर आली आहे. आता काँग्रेसचे वारे आले आहे, हे वारे आता २०२४ पर्यंत वाहत राहणार आहे. आता आपल्यालाही बेसावध राहून चालणार नाही. एकत्र येऊन काम करावे लागेल. एकत्र आल्यावर काय होते, कोणता बदल घडतो हे कर्नाटकने दाखवून दिले आहे.



## बिस्कीट,चॉकलेट बनविणाऱ्या कंपनीस आग

### आग विझवण्यासाठी २५ ते ३० पाण्याच्या गाड्यांचा मारा

सुराज्य/सोलापूर

सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या चिंचोली एमआयडीसी औद्योगिक वसाहतीतील डी.एम.के.फूड फॅक्टरी कंपनीस रविवारी दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास मोठी आग लागली.

या आगीत कोणत्याही प्रकारे जीवित हानी झाली नाही. परंतु, संपूर्ण फॅक्टरी आगीच्या भक्षस्थळी पडली.यात मोठी आर्थिक झाली. प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

डी.एम.के.फूड फॅक्टरी गेल्या अनेक वर्षापासून या ठिकाणी चॉकलेट आणि बिस्किटचे उत्पादन करत असून रविवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास शॉर्टसर्किटने फॅक्टरीला आग लागली. ही आग सर्व दूर पसरली.

यावेळी काही कामगार काम करत होते. त्यांनी ही माहिती तात्काळ अग्निशामक दलाला दिली. या आगीत कच्चामाल व पक्का माल मशनरी तसाच पत्रा शेड असे सर्व जळून खाक झाले.

आगीची घटना कळताच एमआयडीसीतील अग्निशामक दल तसेच महानगरपालिकेचे अग्निशामक दल पथक दाखल झाले. त्यांनी २५ ते ३० पाण्याच्या गाड्यांचा मारा करून आग सायंकाळी आटोक्यात आणली. एमआयडीसी अग्निशामक दलाचे अधिकारी जाट तसेच पालिका अग्निशामक दलाचे प्रमुख केदार आवटे यांनी आपल्या पथकासह आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केजा.

## खर्डी येथे ट्रॅक्टरला धडकल्याने दुचाकी चालक ठार

वैराग : सासुरे (ता.बार्शी) येथील अर्णव कॉलेज जवळ ट्रॅक्टरला पाठीमागून धडकल्याने लक्ष्मण वैजनाथ जाधव (वय ६४ रा.बोरगाव ता.बार्शी) हे दुचाकी चालक गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडला. लक्ष्मण जाधवर हे आपल्या दुचाकीवरून वरून सोलापूरकडे निघाले होते. रात्री ८ वाजेच्या सुमारास सासुरे येथील कॉलेज जवळ एमएच२३-टी ३१६८ या क्रमांकाचा ट्रॅक्टर अचानक ब्रेक मारला. त्यामुळे दुचाकी ट्रॉलीला धडकल्याने लक्ष्मण जाधवर हे जखमी होऊन मरण पावले, अशी नोंद वैराग पोलिसात झाली. या प्रकरणात पोलिसांनी ट्रॅक्टरच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## अल्पवयीन मुलीकडून दोन लाख उकळले

### व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार अत्याचार

सुराज्य/सोलापूर

सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीशी ओळख वाढवून तिच्याशी प्रेमाचे नाटक करत तिला लॉजवर नेऊन जबरदस्तीने बिअर पाजून एका तरुणाने अत्याचार केला. त्यानंतर अत्याचारावेळीचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकि देत तिच्याकडून २ लाख रुपये घेतल्याप्रकरणी ओंकार बाळासाहेब मोरे (वय-२३, रा. सोलापूर) याच्यावर बाल लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत पीडितेने फिर्याद दिली आहे.

पीडितेशी आरोपीची मागच्या वर्षी ओळख झाली होती.त्या ओळखून आरोपीने पीडितेसोबत प्रेमाचे नाटक करत तिला नोव्हेंबर २०२२ मध्ये प्रथम लॉजवर नेत तिला बिअर पाजून ती शुद्धीत नसताना तिच्यावर अत्याचार केला. त्यावेळीचे तिचे फोटो काढून व्हायरल करण्याची धमकि देत माझे कर्ज फेडण्यासाठी पैसे दे म्हणत धमकि दिली. तसेच पीडितेने पैसे दिल्यानंतरही आरोपीने तिच्याशी जबरदस्तीने अत्याचार केला. पीडितेने आपल्या आजीचे एटीएम कार्ड व पासवर्ड ही आरोपी ओंकार मोरे याला दिले.आरोपी हा त्या एटीएमकार्ड व्दारे पैसे काढून घेत होता.थोड्या दिवसांनी पीडितेने याबाबतची माहिती कुटुंबीयांना कळवल्यानंतर ही घटना उघडकीस आली.दरम्यान,



आरोपीने पीडितेकडून २ लाख रुपये घेत अत्याचारातील फोटो व्हायरल करण्याची धमकि देत वारंवार अत्याचार केला असल्याची फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलीस करत आहेत.



## सूर्य पुन्हा तळपला, सोलापूरकरांची होरपळ

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहराचा पारा रविवारी भलताच वाढला. कमाल तापमान ४३.५ सेल्सिअसपर्यंत गेले होते. यंदाच्या उन्हाळ्यातील या तापमानाचा उच्चांक झाला आहे. गेल्या आठवड्यात तापमान ४३.४ अंशांपर्यंत गेले होते.वाढत्या तापमानामुळे गेल्या आठवडाभरापासून सोलापूरकरांना होरपळ सहन करावी लागत आहे.

शुक्रवारनंतर शनिवारी तापमान उतरले होते. पण रविवारी सूर्याचा कोपच झाला. दिवसभर तळपत्या सूर्याने सोलापूरकरांना भाजून काढले.सकाळी दहा नंतर चटके जाणवू लागल्यानंतर सोलापूरकर घरीच बसणे पसंत केले. रस्त्यावरची वर्दळ कमी झाली.बाजारपेठांमध्ये मंदी दिसून आली.

## अवैध वाळू उपशावर कारवाई; चौघांना अटक

सुराज्य/नातेपुते

कदमवाडी (ता. माळशिरस) येथील नांदवी ओढ्यातून अवैध वाळू उपशावर कारवाई करून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून चौघांना अटक करत ५७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नांदवी ओढ्यातून जे.सी.बी.च्या सहाय्याने दोन ट्रॅक्टरच्या ट्रॉल्यामध्ये वाळू चाळण्याची चाळणी लावून काही इसम जे.सी.बी.च्या सहायाने वाळू भरत असताना दिसून आले. तेव्हा चौघांना ताब्यात घेण्यात आले तर २ इसम पळून गेले. पकडलेल्या इसमांच्या कब्जातून एकूण ५७ लाख १६ हजार रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर, धनाजी गाडे, आसिफ शेख, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, अक्षय डोंगरे, चालक समीर शेख यांनी बजावली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मैं बडा.. मैं बडा...

## पित्याने केला पोटच्या मुलीचा अडीच लाखाला सौदा

### मुलीने सोशल मीडियातून आईशी संपर्क साधल्याने झाला पर्दाफाश

सुराज्य/सोलापूर

'एका बाजूला मूल सांभाळण्याची विवंचना अन् दुसऱ्या बाजूला मुलगा हवाच हा आग्रह' असतो. गेल्या ३ दिवसांपूर्वी १८ दिवसांचे बाळ बेकायदेशीर दस्त करून विकण्यात आल्याचा संतापजनक आणि तितकाच चिंताजनक प्रकार उजेडात आला होता. या प्रकरणात सदर बझार पोलिसांनी 'त्या' अभागी बाळाच्या आई-वडील, आजीसह १० आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची घटना ताजी असतानाच अजून एक अशी घटना सोलापुरात उघडकीस आली आहे.



एखाद्या चित्रपटाच्या कथानकाला मागे सारणारा हा वास्तव प्रकार असून, एका अल्पवयीन पंधरा वर्षांच्या पोटच्या मुलीला बापाने चक्क विविध जिल्ह्यातील कला केंद्रात पाठवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, त्या पित्याने मुलीला शहरातील एका कलाकेंद्रात अडीच लाखाला चार महिन्यापूर्वी दिले होते. दरम्यान, मुलीने या घटनेची माहिती आईला सोशल मीडियावरून संपर्क साधनू दिल्यानंतर बापाने केलेले हे कृत्य उघडकीस आले.

सोलापुरातील जोडभावी पेठ पोलीस ठाणे हद्दीतील एक दाम्पत्य यांच्यात कौटुंबिक वाद झाल्याने दोघे विभक्त झाले. यावेळी मुलगी वडिलांकडे राहत होती. पित्याने त्या मुलीला तीन ते चार महिन्यांपूर्वी एका कलाकेंद्रात अडीच लाख रुपये उचल घेत सोपवले. ही घटना मुलीने आपल्या आईला सांगितली. दरम्यान, त्या पीडितेच्या आईने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यासाठी दाखल झाली. या घटनेची माहिती कळताच जोडभावी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे वसंत पवार, विजय जाधव, संजीवनी व्हट्टे यांनी त्या पीडितेची मदत केली. या प्रकरणी पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून रात्री उशिरा गुन्हा दाखल होण्याची प्रक्रिया सुरू होती.

CMYK

# आघाडीचा डांगोरा

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या शपथविधी समारंभासाठी देशातील विविध पक्षांमधील नेते एकत्र आले होते. आगामी लोकसभा निवडणुकित अशींच एकी कायम राहते का, हा खरा प्रश्न आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपच्या विरोधात प्रमुख विरोधी पक्ष एकत्र आल्यास 'बंगळुरू प्रयोग' यशस्वी होऊ शकतो, अशीं चर्चा सुरू होणे स्वाभाविकच आहे. सिद्धरामय्या सरकारच्या शपथविधींला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार व उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचूरी, भाकपचे डी. राजा, तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे सर्वेसर्वा एम. के. स्ट्रलिन, नॅशनल काँन्फरन्सचे डॉ. फारुक अब्दुल्ला, पीडीपीच्या मेहबुबा मुफ्ती, झारखंडचे मुख्यमंत्री व झारखंड मुक्ति मोर्चाचे हेमंत सोरेन, शिवसेनेचे अनिल देसाई, चित्रपट अभिनेते आणि एमएमएम पक्षाचे प्रमुख कमल हसन यांच्यासह राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय २० पक्षांचे नेते उपस्थित होते. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव हे मुख्य विरोधी पक्षाचे नेते मात्र उपस्थित नव्हते. ममतादिदींच्या पक्षाचे प्रतिनिधी शपथविधींला उपस्थित होते. पण ममतादिदींनी बंगळुरूला जाण्याचे टाळले. काँग्रेस पक्षाने आम आदमी पार्टी, भारत राष्ट्र समिती, बहुजन समाज पक्ष या राजकीय पक्षांना शपथविधींला उपस्थित राहण्याचे निमंत्रणच दिले नव्हते. आम आदमी पार्टीची दिल्ली आणि पंजाबमध्ये सत्ता आहे. केजरीवाल, मायावती किंवा के. चंद्रशेखर राव हे नेते भाजपच्या विरोधात असले तरी ते काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारण्यास किंवा काँग्रेसबरोबर काम करण्यास तयार नसतात. यामुळेच विरोधकांची एकी करण्याच्या प्रयत्नांत आम आदमी पार्टी, भारत राष्ट्र समिती वा बहुजन समाज पक्ष एकत्र येण्याची शक्यता कमी आहे. तरीही बंगळुरूमधील शपथविधींला उपस्थित राहिलेल्या पक्षांमध्ये एकी झाली तरी त्याचा वेगळा संदेश जाऊ शकतो, असे राजकीय जाणकार म्हणतात. २०१८ मध्ये काँग्रेसच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री झालेल्या



कुमारस्वामी यांच्या शपथविधींला विरोधी पक्षांच्या नेत्यांनी हजेरी लावली होती. पण तेव्हा बंगळुरू प्रयोग फारसा यशस्वी झाला नव्हता. भाजपाला सत्तेपासून रोखण्यासाठी काँग्रेस व जेडीएस या दोन पक्षांनी एकत्र येऊन सत्ता स्थापन केली. आपल्या जागा सर्वात जास्त असतानाही मुख्यमंत्रिपद जेडीएसला द्यावे लागले, ज्या पक्षाला अत्यंत कमी जागा मिळालेल्या होत्या. काँग्रेस आणि जेडीस यांच्यातील सूत फार दिवस टिकले नाही. तीव्र मतभेद झाले आणि जेडीएसना राजीनामा द्यावा लागला. आघाडी आघाडी म्हणून आज जो डांगोरा पिटवला जात आहे, तो पाहाता आघाडी आहे तरी कुठे? कर्नाटकात काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. काँग्रेसने स्वबळावर हे निर्भेळ यश मिळवले आहे. आघाडी केवळ महाराष्ट्रात आहे. अन्य राज्यात ती कुठेही नाही. भाजपेतर पक्षांची जिथे सत्ता आहे, तिथल्या पक्षांची सत्ता स्वबळावरची आहे. महाराष्ट्रात तीन पक्षांची आघाडी आहे पण तिथेही धुसपूस आहे.शिवसेनेचा वरचढपणा राष्ट्रवादींला सहन होत नाहीय. राष्ट्रवादींची 'दादा'गिरी काँग्रेसला त्रासदायक ठरले आहे. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकींच्या अनुषंगाने जागा वाटपाबाबत आघाडीत तीव्र मतभेद होण्याची चिन्हे दिसत आहेत. मतभेद तुटेपर्यंत ताणले गेले तर शिवसेना ठाकरे गट आघाडीतून बाहेर पडेल, असे वाटते.राष्ट्रवादींला तेच हवे आहे.आघाडीत लहान कोण वा मोठा कोण यावरून सध्या संघर्ष सुरू आहे. महाराष्ट्रात जागा वाटप करताना आपल्याला लहान भाऊ म्हणून भूमिका घ्यावी लागायची. पण आता आपण काँग्रेसपेक्षा मोठे भाऊ झालो आहोत. कारण त्यांच्या ४४ जागा आहेत आणि ५४ जागा आहेत. उद्धव ठाकरेंकडे ५६ आमदार होते. हे गणित आहे, हे अजित पवार यांचे वक्तव्य बरेच काही सांगून जाणारे आहे. त्यांच्या या वक्तव्यावरून आता महाविकास आघाडीतच अंतर्गत वाद सुरू होण्याची शक्यता आहे. दरम्यान, यावरून महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही प्रत्युत्तर दिले. कुठल्याही वादात तोंड उघडणार नाहीत ते राऊत कसले? आपण महाविकास आघाडीचा घटक पक्ष आहोत. आघाडी आपल्याला मजबूत ठेवायची आहे. पण हे करत असताना लक्षात ठेवा की तुमची ताकद जास्त असेल तरच तुम्हाला महाविकास आघाडीत महत्त्व दिले जाईल, असे राऊत म्हणाले. आघाडीत शिवसेना मोठी आहे. त्यामुळेच राऊत आपला तोरा दाखवत असतात.कोण मोठा यावरूनच आघाडीत बिघाडी होणार, असे दिसते. आता प्रश्न उरला तो दिल्लीचा. केंद्रीय राजकारणात विरोधकांची आघाडी होणार कशी? केवळ हातात हात घातले म्हणून आघाडी होत नाही. त्यासाठी वैचारिक एकी हवी. केवळ आघाडीचा डांगोरा पिटवून कसे चालेल?

## राजकीय

# सिद्धरामैया X शिवकुमार

कर्नाटक राज्यासाठी पक्षाचे संपर्क प्रमुख रणदीपसिंह सुरजेवाला आणि पक्षाचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी शिवकुमार यांच्याबरोबर अनेक बैठका घेतल्या. राहुल गांधी व प्रियंका वाड्रा यांच्यासमवेतही स्वतंत्र बैठका झाल्या. सिद्धरामैया मुख्यमंत्री होणार असतील, तर कोणताही निर्णय आपल्या मान्यतेशिवाय होता कामा नये, अशी प्रमुख अट शिवकुमार यांनी हायकमांडकडे ठेवली होती. पहिली अडीच वर्षे सिद्धरामैया मुख्यमंत्री असतील व नंतरची अडीच वर्षे शिवकुमार असतील, असाही समझोता झाला. मंत्रिमंडळाच्या खातेवाटपातही आपल्याला विश्वासात घेतले पाहिजे, असे शिवकुमार यांनी म्हटले आहे. सन २०१३ ते २०१८ या काळात सिद्धरामैया हे मुख्यमंत्री होते. पण त्यांना पक्षाच्या हायकमांडने पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. तेव्हा ते सर्व निर्णय त्यांच्या मर्जीनुसार घेत होते. आता मात्र प्रत्येक निर्णय घेताना त्यांना शिवकुमार यांना विश्वासात घ्यावे लागणार आहे. शिवकुमार यांच्याकडे उपमुख्यमंत्रिपदाबरोबरच पक्षाचे प्रदेशाध्यपदही असेल, असे ठरविण्यात आले आहे. पुढील वर्षी होणारी लोकसभा निवडणूक होईपर्यंत शिवकुमार हेच कर्नाटक प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष असतील.

काँग्रेसला मिळालेल्या यशामध्ये शिवकुमार यांचा प्रदेशाध्यक्ष म्हणून मोठा वाटा आहे. मुख्यमंत्रिपदाचे ते प्रबळ दावेदार होते, हे सर्वांना ठाऊक होते. जोपर्यंत निकाल जाहीर होत नाहीत, तोपर्यंत शिवकुमार शांत बसले होते. पण जेव्हा काँग्रेस विधिमंडळाचा नेता कोण? हे ठरविण्याची वेळ आली आणि पक्षाचे निरीक्षक आमदारांना भेटण्यासाठी बंगळुरुला आले तेव्हा मात्र शिवकुमार यांनी आपली महत्त्वाकांक्षा श्रेष्ठींना बोलून दाखवली. अगदी सोनिया गांधींच्या मनातही शिवकुमार यांच्याकडेच राज्याचे नेतृत्व सोपविण्याचे होते, असे म्हटले जाते. पण त्यांच्या निवडीला काही मुद्दे अडथळा ठरत होते. काँग्रेसला मिळालेल्या यशावर त्याने पाणी पडले असते. त्यांची थेट मुख्यमंत्रिपदावर नेमणूक झाली असती, तर पक्षाला ते कदाचित नुकसानीचेही ठरले असते. शिवकुमार यांची सीबीआय आणि ईडीकडून चौकशी चालू आहे, हाच त्यांना मुख्यमंत्रिपदावर नेमण्यामध्ये सर्वात मोठा अडथळा ठरला. अशा नेत्याला मुख्यमंत्रिपदावर बसविले की, 'भाजपकडून रोज जोरदार हल्ले सुरू होतील व त्यात पक्षाचे मोठे नुकसान होऊ शकते. काल-परवापर्यंत कर्नाटकमध्ये असणारे पोलीस महासंचालक प्रवीण सूद यांची केंद्र सरकारने सीबीआय संचालकपदावर नेमणूक केली आहे. ही नेमणूक कर्नाटकच्या निकालानंतर जाहीर झाली आहे.'

शिवकुमार व प्रवीण सूद यांचे मुळींच सख्य नव्हते. सूद यांना जाणूनबुजून बंगळुरुमधून हटवून दिल्लीला सीबीआय संचालकपदावरनेम्यात आले अशी चर्चा आहे. आपले (काँग्रेसचे) सरकार आल्यानंतर सूद यांच्यावर कारवाई करण्याची भाषा शिवकुमार यांनी केलेली होती. याची आज आठवण करून दिली जात आहे. डीके शिवकुमार हे वोक्कालिंगा समाजाचे आहेत. राज्यात हा समाज ११ टक्के आहे. जुन्या म्हैसूर प्रांतात हा समाज अधिक आहे. तेथे शिवकुमार यांचा प्रभाव आहे. पण संपूर्ण राज्याचा विचार केला, तर सिद्धरामैया यांचा प्रभाव शिवकुमार यांना भारी पडणारा आहे. ते कुरबा समाजाचे आहेत. दलित, मागास, मुस्लीम समाजावर त्यांची पकड मजबूत आहे. सिद्धरामैया यांची सार्वजनिक प्रतिमा धर्मनिरपेक्ष आहे. कर्नाटकात लोकसभेच्या २८ जागा आहेत. यापैकी सध्या एकच खासदार काँग्रेस पक्षाचा आहे. ते सुद्धा शिवकुमार यांचे धाकटे बंधू डी. के. सुरेश आहेत. काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळाले म्हणून लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे जास्तीत-जास्त खासदार कर्नाटकातून निवडून यावेत, असे श्रेष्ठींना वाटते.

सिद्धरामैया यांचा चेहरा व शिवकुमार यांचे संघटन कौशल्य याचा लाभ पक्षाला मिळेल, अशी गणिते दिल्लीतील श्रेष्ठी मांडत आहेत. निकालानंतर एक मात्र स्पष्ट झाले की, कर्नाटकच्या राजकारणात शिवकुमार हे आज केंद्रस्थानी आले आहेत. त्यांच्या पसंतीच्या आमदारांना मंत्रिपदे मिळतीलच, त्यांना चांगली खातीही मिळू शकतील. पण प्रत्येक बाबतीत सिद्धरामैया हे शिवकुमार यांची संमती घेऊन निर्णय घेतील का? सिद्धरामैया हे पूर्वी मुख्यमंत्री होते. त्यांचा प्रशासकीय अनुभव दांडगा आहे. एकदा मुख्यमंत्रिपदाची माळ गळ्यात घातली की, प्रत्येक फाईल शिवकुमार यांच्याकडे ते पाठवील का? उपमुख्यमंत्री म्हणून शिवकुमार यांना किती अधिकार प्रदान करणार, हे मुख्यमंत्र्यांवर अवलंबून आहे. देशात या घडीला १० राज्यांत १७ उपमुख्यमंत्री आहेत. महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सन्मान तर आहेच, पण विशेष महत्त्व आहे. त्यांची सरकारवर मजबूत पकड आहे. बिहारमध्ये उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री नितीशकुमार सदैव आपल्याबरोबर घेऊन फिरत असतात. उत्तर प्रदेशात दोन, तर आंध्रप्रदेशात पाच उपमुख्यमंत्री आहेत. सिद्धरामैया हे त्यांचे पक्षांतर्गत स्पर्धक असलेल्या शिवकुमार यांना किती महत्त्व देतात, हे लवकरच समजेल. कर्नाटकच्या राजकारणात येडियुरप्पा व सिद्धरामैया हे ताकदवान नेते आहेत.

येडियुरप्पा सक्रिय राजकारणातून बाहेर पडल्याने सिद्धरामैया यांचे महत्त्व वाढले आहे. निवडणुकीच्या काळात जेवढे एक्झिट व ओपिनिअन पोल झाले, त्यात सिद्धरामैया यांनाच मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक पसंती दिसून आली होती. दलित, मुस्लीम व ओबीसींना जोडणारा नेता म्हणून सिद्धरामैया हे काँग्रेसला अधिक उपयुक्त वाटतात. २०१३ मध्ये ते मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांनी ५ वर्षांचा कार्यकाल पूर्ण केला. गेल्या ४० वर्षांत आपली टर्म पूर्ण करणारे ते पहिलेच मुख्यमंत्री ठरले. या सर्व मुद्द्यांमुळे ते शिवकुमारांवर वरचढ ठरले.

शिवकुमार यांच्यावर सन २०१९ मध्ये केंद्रीय यंत्रणांनी चौकशी सुरू केली. तेव्हा राज्यात भाजपचे सरकार होते व बी. एस. येडियुरप्पा हे मुख्यमंत्री होते. शिवकुमार यांनी या चौकशीला उच्च न्यायालयात आव्हान दिले. पण, न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून लावली. निवडणुकीत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी त्यांची संपत्ती १४१३ कोटी असल्याची नोंद केली आहे. २०१८ मध्ये हीच संपत्ती ८४० कोटी होती. अटी स्वीकारून व तडजोड करून सरकार चालवणे ही सिद्धरामैया यांना मोठी कसरत करावी लागणार आहे.



कर्नाटकचे तेविसावे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेस हायकमांडच्या आशीर्वादाने सिद्धरामैया यांच्या मस्तकावर मुख्यमंत्रिपदाचा मुकुट चढवला गेला असला तरी डी. के. शिवकुमार यांचा तोरा व रुबाब बघता तेच सुपर चीफ मिनिस्टर असतील, असे चित्र निर्माण झाले आहे. सिद्धरामैया हे ७५ वर्षांचे आहेत, तर शिवकुमार हे ६१ वर्षांचे आहेत. यंदा लढवलेली आपली शेवटची निवडणूक होती, असे सिद्धरामैया यांनी म्हटले आहे, तर शिवकुमार यांनी अनेक अटी लादून त्यांना मुख्यमंत्रिपद देण्यास मान्यता दिली आहे. शिवशंकर यांनी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारलेले असले तरी अडीच वर्षांनी म्हणजे २०२५ मध्ये ते मुख्यमंत्री होतील, अशी तडजोड झाली आहे. सिद्धरामैया हे मुख्यमंत्रिपदावर बसणार असले तरी उपमुख्यमंत्र्यांनी हिरवा कंदील दाखविल्याशिवाय ते अंतिम निर्णय घेऊ शकणार नाहीत, अशी शिवशंकर यांनी अट घातली आहे. म्हणूनच सिद्धरामैया यांना मुख्यमंत्री म्हणून काम करणे सोपे असणार नाही.

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

## प्रासंगिक

# लोककल्याणकारी नेतृत्व : सेवायात्री

महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे कॅबिनेट मंत्री दर्जा लाभलेले माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे म्हणजे समाजकारण, सार्वजनिक बांधकाम क्षेत्र, गृहनिर्माण क्षेत्र, राजकारण या क्षेत्रातील उत्तुंग भरारी आहे. मांडेगावसारख्या बार्शी तालुक्यातील छोट्याशा खेडेगावातून त्यांनी बार्शी ते मुंबई अशी केलेली वाटचाल हे त्यांच्या कर्तृत्वाचे प्रतिक आहे. मिरगणे यांनी स्वखर्चाने बार्शी तालुका व उस्मानाबाद जिल्ह्यात दुष्काळग्रस्त परिस्थितीत सलग साडेचार महिने १०० टँकरने गरजू जनतेला मोफत पाणी पुरवठा केला. मिरगणे यांनी तालुक्यातील जेष्ठ नागरिकांना मोफत तीर्थयात्रा घडवली. त्यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप केले. गरिब कुटूंबातील वधु-वरांच्या वेळ, श्रम आणि पैश्याची बचत करणारे सामुदायिक विवाह सोहळे घडवले. नेत्र चिकित्सेचे महत्व ओळखून तालुक्यातील गरिबांसाठी मोफत नेत्र चिकित्सा मोफत चष्मे वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीरांचे आयोजन केले. या शिबीराला पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांचे मार्गदर्शन लाभले होते. मिरगणे यांनी आपल्या वाढदिवसाचा खर्च टाळून गरिब विद्यार्थ्यांना अडींच लाख मोफत वह्यांचे वाटप केले.



राज्यातील संभाव्य पोलीस भरती लक्षात घेवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मोफत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे आयोजन केले. तसेच मोफत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन केले. कारी येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत केली. बार्शी शहरानजीक ओढ्यात बुडून मरण पावलेल्या चार शाळकरी मुलींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत केली. मांडेगावातील खराब रस्त्याची अवस्था लक्षात घेऊन खडीकरणासाठी यंत्रसामुग्री पुरवले.


जलसंधारणाची गरज ओळखून पाण्याची बचत करण्यासाठी भूमिगत वॉटर बँकची संकल्पना प्रत्यक्षात आणणारा आर.एस.एम. जलसंधारण पॅटर्न राबवला. कोरोनाच्या संकट काळात गरजू जनतेला मोफत मास्क व सॅनिटायझर्स आणि अन्नदान केले. लसीकरणासाठी कार्यकर्त्यामार्फत मदत केली. मिरगणे यांचे हे सामाजिक कार्य लक्षात घेऊन भाजपा सरकारने त्यांची बाजार समिती व संतनाथ सहकारी साखर कारखान्याच्या प्रशासकपदी नियुक्ती केली. मिरगणे यांनी आपल्या प्रशासकपदाच्या कार्यकाळात बाजार समितीचे उत्पन्न वाढवले. शेतकऱ्यांना हमीभाव दिला. शेतीमाल तारण कर्ज योजना राबवली. हमाल, तोलार, व्यापारी, शेतकरी यांचे हित जपले. संतनाथ सहकारी साखर कारखान्याची कवडीमोल भावात लिलावाने होणारी विक्री सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा देऊन थांबवली.

आपल्या कार्यकाळात मिरगणे यांनी गरजूंना अधिकाधिक घरे स्वस्त दरात विविध कर्ज व अनुदान यांच्या माध्यमातून सर्व तांत्रिक अडचणी दूर करत उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी काम केले. त्यांनी स्मार्ट व्हिलेजपासून ते कामगारनगर पर्यंत आणि शासकिय कर्मचाऱ्यांच्या वसाहतीच्या निर्माणापासून पूरग्रस्त भागातील गृहनिर्माण पुनर्वसन यासारख्या अनेक आघाड्यांवर काम केले.

मिरगणे यांनी महामंडळाच्या माध्यमातून केलेल्या कामाची पोचपावती म्हणून त्यांच्याकडे विविध उच्चाधिकार समित्यांचे कामकाज सोपवले होते. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत राज्यातील गृहनिर्माण मंजुरी व सनियंत्रण समितीमध्ये त्यांना तांत्रिक सल्लागाराची जबाबदारी सोपविण्यात आली होती. तसेच स्वयंपुनर्विकास प्रकल्पातही सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. भविष्यातही त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली जावी अशी बार्शीकरांची अपेक्षा आहे.

**- सचिन अपसिंगकर.**

## जन्म हा अखेरचा



### इंद्रियानुग्रहस्थल - १

ज्या इंद्रियांना शिवाचा अनुभव येत नाही, त्या इंद्रियांजवळ अनुग्रहाचे सामर्थ्य नसते. ज्या हातांनी भगवंताची पूजा होत नाही, ते हात आशीर्वाद द्यायला असमर्थ ठरतात. जे पाय मंदिराच्या दिशेने चालत नाहीत आणि मंदिराची परिक्रमा करत नाहीत, त्या पायांवर डोके ठेवून कुणाचे कल्याण होत नसते.

जी दृष्टी भगवंताचे रुप न्याहाळते, त्या दृष्टीत आणि जी वाणी भगवंताचे गुणगान करते, त्या वाणीत अनुग्रह करण्याचे सामर्थ्य असते. शिवयोगी दर्शन देऊन, स्पर्श करुन, आशीर्वाद देऊन भक्तांवर अनुग्रह करतो. इंद्रियांच्याद्वारा अनुग्रह करण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ असल्यामुळे त्याला 'इंद्रियानुग्राहक' असे म्हटले जाते. **सर्वेंद्रियनिरुढोऽपि सर्वेंद्रियविहीनवान् ।**

**शिवाहितमना योगी शिवं पश्यति नापरम् ।। (१७.१८।।)**

शिवयोग्याची सर्व इंद्रिये जेव्हा शिवमय होतात तेव्हा तो इंद्रिये असूनदेखील इंद्रियरहित होतो. त्याच्या इंद्रियांना शिवाशिवाय दुसरे काहीच दिसत नाही. शिवयोगी इंद्रियांनी भक्तांवर अनुग्रह करतो, म्हणून या स्थलाला 'इंद्रियानुग्रहस्थल' असे म्हणतात. आपण इंद्रियानुग्रह या उपस्थलाविषयी ऐकत आहात. ज्याची इंद्रिये अंतर्मुख होऊन हृदयस्थ शिवाचे दर्शन घेताता, असा शिवयोगी आपल्या इंद्रियांनी भक्तांवर अनुग्रह करतो. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**


# आधुनिक भारताचे जनक

भारत देशात अनेक महान व्यक्तिमत्व जन्माला आले. त्यांच्या कृतिशील कार्यामुळे जनमाणसाला विचाराची नवी दिशा मिळाली हे आपले भाग्य आहे की, या महान लोकांमुळे समाज बदलला, नवी शिकवण अंगीकारली, नव्याची कास धरली, या महान व्यक्तींपैकी एक थोर समाज सुधारक म्हणजे राजा राममोहन रॉय होय.

राजा राममोहन रॉय यांनी आधुनिक भारताची सुरुवात केली, त्यांच्या कार्यामुळे भारतात १९व्या शतकात धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली. भारतातील धार्मिक तसेच सामाजिक सुधारणा चळवळींचे आद्य प्रवर्तक म्हणून राजाराम मोहन रॉय यांना निर्देश करावा लागेल. ते थोर समाजसुधारक होते. आधुनिक विचारसरणीचे मानवतावादी समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांचे कार्य अतुलनीय आहे. अशा या महान व्यक्तिमत्त्वाचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील हुबळी जिल्ह्यातील राधानगर या गावी झाला.

राजा राममोहन रॉय हे बालवयापासूनच अतिशय हुशार चतुर होती, आईच्या संस्कारातून बालवयापासूनच त्यांना शिक्षणाचे धडे मिळत होते. त्यांनी विविध भाषांचा अभ्यास केला. त्याचा विविध विषयांचा अभ्यास असल्यामुळे विविध धर्मांचा मनापासून व मुळापासून अभ्यास करणे व त्याचे तुलनात्मक विश्लेषण करणे त्यांना सहज शक्य झाले. राजाराममोहन रॉय हे अत्यंत हुशार अभ्यासू व्यक्तिमत्व होते. त्यांच्या लहान वयातच त्यांच्या भावी थोरपणाची असामान्यता दिसून आली होती.

राजा राममोहन रॉय हे एक महान ऐतिहासिक विद्वान म्हणून ओळखले जातात, ज्यांनी भारताला आधुनिक भारतात बदलण्याकरता बराच संघर्ष केला आणि पिढ्यान्पिढ्यांपासून चालत आलेल्या कुप्रथांना बंद करण्याचे कार्य केले. समाजात परिवर्तन घडवण्याकरता त्यांनी बरेच समाजोपयोगी कार्य केले. आपल्या देशात महिलांची स्थिती मजबूत बनवण्यात त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे.रॉय यांनी सती प्रथेविरूद्ध कडाडून विरोध केला, ते एक महान विद्वान होते, ज्यांनी बऱ्याच पुस्तकांचे भाषांतर केले होते.



राजा राममोहन रॉय हे धर्मसुधारक व त्याचे उपासक होते. त्यांनी विद्यार्थीदशेतच विविध धर्माच्या ग्रंथाचा अभ्यास केला, निरनिराळ्या धर्माचा तुलनात्मक अभ्यास करून ते अशा निष्कर्षाप्रत पोहोचले होते की, 'जगातील सर्व धर्म मानवतावादाचा पुरस्कार करीत असल्याने प्रत्येक धर्म आपल्या परीने श्रेष्ठ आहे'. राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केला. व्यक्तीने कोणत्याच धर्माचा द्वेष करू नये असे त्यांनी सांगितले होते.

राजा राममोहन रॉय यांनी नोकरी ही केली. नंतर आत्मिक सभेची स्थापना करून त्यामधून धर्म, तत्वज्ञान तसेच सती, जातीभेद, कुलीनपणा आदी अनिष्ट प्रथाविरूद्ध लढा दिला. या सभेचा उद्देश अध्यात्मिक होता. राजा राममोहन रॉय यांनी सतीच्या अनिष्ट प्रवृत्ती विरुद्ध जोरदार आवाज उठवला, ही प्रथा कायद्याने बंद होईल म्हणून यशस्वी प्रयत्न केले, त्यामुळे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड विल्यम बेंटिंग यांनी सतीची चाल बंद करण्यासंबंधीचा कायदा आणला.

त्यांनी आधुनिक युगाची सुरुवात केली,त्यांचे विचार त्यांनी केलेले कार्य अत्यत मोलाचे व आजही प्रेरणादायी ठरते आहे. अशा या महान व्यक्तिमत्वाला त्याच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन व माझे कोटी कोटी प्रणाम...!

**- राहुल मोरे, बीड.**



## - संतविचार -

डॉ. देविदास गुरव, सोलापूर

# 'जो सर्व भुतांचा ठायी'

**'जो सर्व भुतांचा ठायी । द्वेषाते नेणेचि काही**
**आपपरु नाही । चैतन्य जैसा ।।**
**उत्तमाते धरिजे । अधमाते अव्हेरिजे**
**हे काहींच नेणिजे । वसुधा जेवी'**

सर्वव्यापी चैतन्याला आपपर भाव नसतो. त्याप्रमाणे ज्ञानी भक्ताला आपला व परकेपणा ठाऊक नसतो. तो कोणत्याही प्राण्याचा द्वेष करण्याचे जाणत नाही. ज्ञानी भक्त कसा असतो, हे ज्ञानेश्वरींच्या १२ व्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी कथन केले आहे. भक्तियोगाचे विवरण करताना ज्ञानी भक्ताचे लक्षण सांगताना माउली म्हणतात, 'ज्याप्रमाणे पृथ्वीला उत्तमाचा स्वीकार आणि अधमाचा अव्हेर करावा हे माहीत नसते तद्वत ज्ञानी भक्ताचे आचरण असते.' त्याच्या ठायी निरंतर अद्वैत संचारत असतो. आपल्याला भेटणारा प्रत्येक जीव हा परमात्मा आहे अशी त्याची दृढ भावना असते. उदक जसे सर्वांची तृष्णा भागवते तैसे योगीयाची सर्व प्राणिमात्रांशी मैत्रभाव असतो. अशा शब्दात माउलींने ज्ञानी भक्तांचे लक्षण स्पष्ट केले आहे. याही पुढे जाऊन माउली म्हणतात कीं,

**'आता दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी।**
**निववीता न कडसी । सान थोर'**

अशा भक्ताच्या अंत:करणात चंद्रिकेप्रमाणे शीतलता असते. तो सर्वांवरच अमृतमय प्रेमाचा वर्षाव करतो. तो अंतर्बाह्य तृप्त असतो. समुद्राची लाट समुद्रापेक्षावेगळी नसते त्याप्रमाणे खरा भक्त ईश्वराहून वेगळा नसतो. ज्ञानीभक्त हा सर्वांपेक्षा वेगळाच असतो. दु:खाने त्रासलेला, अपेक्षा बाळगणारा, द्रव्यलोभी आणि ब्रह्मज्ञान प्राप्त झालेला अशा प्रकारचे भक्त ईश्वराची भक्ती करतात. परंतु या सर्वात ज्ञानी भक्तच भगवंतालाच प्रिय असतात आणि तोच खरा श्रेष्ठ भक्त होय. कारण सांगताना माउली म्हणतात,

**जो निजानंदे धाला । परिणामु आयुष्या आला**
**। पूर्णते जाहला । वल्लभु जो**

जो आत्मानंदाने सदैव तृप्त आहे, जणू काही ब्रह्मच याच्या रूपाने साकार झाले व म्हणून तो पूर्णतेचा स्वामी आहे. उत्तम भक्ताची अनेक लक्षणे सांगताना भगवंत म्हणतात, 'जो माझा भक्त नि:स्पृह व निरपेक्ष आहे, अंतर्बाह्य पवित्र आहे, भौतिक सुखाविषयी उदासीन आहे, निर्भय व फलाच्या इच्छेने कोणतेही कर्म न करणारा असा भक्त मला अतिशय प्रिय आहे.' याचे सुंदर विवेचन ज्ञानेश्वर महाराजांनी केले आहे. 'ज्याप्रमाणे जलचरांना समुद्राचा कंटाळा येत नाही व जलचरांना समुद्र नकोसा वाटत नाही तद्वत शरीर हे अवयवांना कंटाळत नाही. त्याप्रमाणे आपण सर्वांचा जीव आहोत अशी खऱ्या भक्ताची आत्मैक्यबुध्दी असल्याने तो अवघ्या प्राणिमात्रांना कंटाळत नाही. अशा भक्तांसाठी **'अवघे विश्वच देह'** होऊन जाते.



सुखदु:खादी द्वंद्वापासून सदा मुक्त असलेला, भय, चिंत-चित्तक्षोभरहित असलेला, ईश्वरचरणी शरण्य असलेला, आत्मज्ञानाने सदैव तृप्त जणू ब्रह्मच त्याच्या रूपाने साकार झाले तोच परिपूर्ण आहे, तोच ज्ञानी भक्त होय. माउलीचे हे उद्गार विलक्षण महत्त्वाचे आहे. एकेक सद्गुण जमा करताना भक्ताला किती कष्ट सोसावे लागत असतील, किती यातना भोगाव्या लागत असतील याची कल्पनाच न केलेली बरी! ज्ञानी भक्त होणे ही सोपी गोष्ट नाही निमिषागणिक याची जाणीवही माउली करून देतात. सर्वच संत मंडळींनी आपल्या आचरणातून, विचारातून व वाणीतून खरा व श्रेष्ठ भक्त होण्याचा मार्ग आपणा सर्वांना दाखवला आहे त्या पथावरून आपल्याला निष्ठापूर्वक मार्गक्रमण करायचे आह हे निश्चित.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# आजची भाजप अटलबिहारी, अडवाणी यांची राहिली नाही : प्रा. निंबर्गी

✔ सुराज्य/सोलापूर

**३३ वर्षांपासून भाजपमध्ये सक्रिय होतो. आज पक्ष सोडताना फार घालमेल होत आहे. आजची भापज अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांची राहिलेली नाही. सोलापुरात स्थानिक नेतृत्वामुळे अनेक भाजप पदाधिकाऱ्यांची घुसमट होत आहे. मी आज त्याला तोंड फोडत काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याचे प्रा. अशोक निंबर्गी यांनी सांगितले.**

## शिंदे, पटोलेंच्या उपस्थित केला काँग्रेस प्रवेश



भारतीय जनता पक्षाचे सोलापूर माजी शहराध्यक्ष प्रा. अशोक निंबर्गी यांनी पक्षांतर्गत गटबाजीला कंटाळून रविवारी काँग्रेसमध्ये प्रवेश केला, त्यावेळी ते बोलत होते प्रदेशाध्यक्ष पटोले, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण व इतर नेत्यांच्या उपस्थितीत निंबर्गी यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

निंबर्गी म्हणाले की, सोलापुरातील स्थानिक नेतृत्वाला संगळे कंटाळले आहेत. एकाची जिरवा आणि दुसऱ्याची आडवा असा प्रकार त्यांच्याकडून होत आहे. लोकांना बदल हवा होता म्हणून महापालिकेत भाजपला सत्ता दिली. मात्र दोन्ही आमदारांनी त्याचा उपयोग केला नाही. महापौर निवडीत तर बराच गोंधळ केला. स्वतःच्या जातीच्या महापौराला विरोध केला, कदाचित हे महापौर उद्या उमेदवारी मागतील म्हणून हे कारस्थान केले, असा आरोप निंबर्गी यांनी आ. विजयकुमार देशमुख यांचे नाव न घेता केला. दोन्ही आमदारांच्या वादात वरिष्ठ पातळीवरूनही लक्ष घातले गेले नाही. आमच्यावर केवळ हुकूमशाही पद्धतीने आदेश देत ते लोकशाही पद्धतीने राबवा असे सांगण्यात येत होते. त्यामुळे कंटाळून आपण भाजप सोडली आणि शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये आल्याचे ते म्हणाले. आगामी काळात शहराध्यक्ष चेतन नराटे यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेत सत्ता आणयाची हे एकच लक्ष असल्याचे निंबर्गी म्हणाले.

## भाजपची उलटी गिनती सुरू: नरोटे

अशोक निंबर्गी काँग्रेसमध्ये आले आता भाजपाची उलटी गिनती सुरू झाली. मोठ्या अपेक्षेने भाजपला लोकांनी महापालिकेत सत्ता दिली, मात्र दोन्ही आमदारांच्या भांडणात विकासकामे झाली नाहीत. खुद्द पंतप्रधान मोदी यांनी सोलापुरात येऊन १० प्रकल्पाचे उद्घाटन केले मात्र सात वर्षात एकही प्रकल्प पूर्ण झाला नाही. स्मार्टसिटीच्या नावाखाली लोकांना लुटण्याचे काम भाजपने केले आहे. आता महापालिकेतून भाजपला हद्दपार करण्याची वेळ आल्याचे सांगत काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी शिंदे यांना खासदार करावे तर आ.प्रणिती शिंदे यांना कॅबिनेट मंत्री करावे, अशी मागणी नाना पटोले यांच्याकडे केली.

# आर. एस. एम. केसरी जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन

▶▶ आर.एस.एम. केसरीला मिळणार ५ लाख रूपये व चांदीची गदा ▶▶ इतर नऊ विजेत्यांनाही मिळणार लाखोंची बक्षिसे

✔ सुराज्य/बार्शी

महाहौसिंगचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२२ मे रोजी भगवंत मैदान येथे मित्र मंडळाच्या वतीने आर.एस.एम. केसरी जंगी कुसत्यांचे मैदान आयोजित करण्यात आल्याची माहिती संयोजक सुरज डमरे, बिभीषन पाटील, रामेश्वर स्वामी यांनी दिली.

आर.एस.एम. केसरी कुस्तीच्या मानकऱ्यास ५ लाख रूपये रोख व चांदीची गदा दिली जाणार असून हि कुस्ती कोल्हापूरच्या महान भारत केसरी कुस्ती स्पर्धेचा विजेता सिकंदर शेख व हरियाणाचा भारत केसरी विजेता मंजित खत्री यांच्यात होणार आहे. तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या विजेत्यास ३ लाख रूपये रोख दिले जाणार असून ही कुस्ती कोल्हापूरचा उपमहाराष्ट्र केसरी विजेता प्रकाश बनकर व उपमहाराष्ट्र केसरी पुणेचा विजेता गणेश जगताप यांच्यात होणार आहे. तसेच तिसऱ्या क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रूपये रोख दिले जाणार असून हि कुस्ती महाराष्ट्र चॅम्पीयन अकुलजचा विजेता संतोष जगताप व कुमार भारत केसरी पंजाबचा विजेता कमलजित सिंग यांच्यात होणार आहे. तसेच चौथ्या क्रमांकाच्या विजेत्यास ९० हजार रूपये रोख दिले जाणार असून हि कुस्ती भैरवनाथ केसरी आगळगांवचा विजेता मनोज माने व महाराष्ट्र चॅम्पीयन कोल्हापूरचा विजेता भैरू माने यांच्यात होणार आहे.



याशिवाय पाचव्या क्रमाकांच्या कुस्ती स्पर्धेच्या मानकऱ्यास ७५ हजार रूपये रोख दिले जाणार असून हि कुस्ती अकुलजचा विजय मांडवे व कोल्हापूरचा शशिकांत बोगार्ड यांच्यात होणार आहे. तसेच सहाव्या क्रमांकाच्या कुस्ती स्पर्धेच्या मानकऱ्यास ७५ हजार रूपये रोख दिले जाणार असून हि कुस्ती खुडूसचा हर्षल जगदाळे व कोल्हापूरचा सागर चौगुले यांच्यात होणार आहे. तसेच सातव्या क्रमांकाच्या कुस्ती स्पर्धेच्या मानकऱ्यास ५० हजार रूपये रोख दिले जाणार असून हि कुस्ती कोल्हापूरचा बबलू सुतार व खुडूसचा परमेश्वर गाडे यांच्यात होणार आहे. तसेच आठव्या क्रमांकाच्या कुस्ती स्पर्धेच्या मानकऱ्यास ३० हजार रूपये रोख दिले जाणार असून हि कुस्ती टेंभुर्णीचा विश्वजीत सोलंगकर व खुडूसचा विजय दोलतडे यांच्यात होणार आहे. तसेच नवव्या क्रमांकाच्या कुस्ती स्पर्धेच्या मानकऱ्यास २० हजार रूपये रोख दिले जाणार असून हि कुस्ती बार्शीचा प्रविण घाडगे व अकलूजचा लखन लोंढे यांच्यात होणार आहे. तसेच दहाव्या क्रमांकाच्या कुस्ती स्पर्धेच्या मानकऱ्यास १० हजार रूपये रोख दिले जाणार असून हि कुस्ती मगरवाडीचा सुरज मगर व कोल्हापूरचा महेश काळे यांच्यात होणार आहे.

या मोठ्या कुस्त्याशिवाय या मैदानामध्ये १००/- रूपयापासून १०,०००/- रूपयांपर्यंतच्या रकमांची पारितोषिके असलेल्या कुस्त्या होणार आहेत. कुस्ती स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी वस्ताद रामभाऊ बेणे, माजी नगरसेवक राजाभाउ काकडे, साहेबराव देशमुख, कुणाल घोलप, अविनाश शिंदे, बाळासाहेब पवार, नितिन सोडळ, शिरीष घळके, अतिष बिसेन, चनाप्पा चौगुले, शाम शिंदे, अमर आवटे, अजय दराडे, शरीफ शेख, नाना पाटील, राजाभाऊ मिरगणे, रविंद्र सांगोळे, संभाजी सोनवणे, अश्विन गाढवे, संदिप उकिरडे, मोहन गर्जे, विष्णू पवार आदी परिश्रम घेत आहेत.








## युवक, विद्यार्थ्यांचा मनसेत प्रवेश

**सोलापूर** : महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सोलापूर शहरात असंख्य युवकांनी व विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेमध्ये प्रवेश केला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर विद्यार्थी सेना राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे यांनी मनसेनेत स्वागत केले. आदित्य महिंद्रकर, मनोज अंजीखाने, विजय कर्वे, मयुरेश्वर वडतीले, शहर उपाध्यक्ष यश महिंद्रकर, अक्षय आडम, वैभव रंपुरे, गणेश पवार, दिगंबर अंजीखाने ,चंद्रकांत दहिहांडे, ऋषी आळंद व असंख्य विद्यार्थी उपस्थित होतेफ

## पतीने-पत्नीच्या डोक्यात घातला कोयता

**सोलापूर** : दारू पिऊन घरी येऊन पतीने पत्नीच्या डोक्यात कोयता मारून जखमी केल्याप्रकरणी पतीविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २० मे रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास विजापूर नाका झोपडपट्टी क्रमांक १ येथे घडली.याप्रकरणी पत्नी अंजली नागेश वाघमारे (वय-३२,रा.विजापूर नाका,झोपडपट्टी क्रमांक १) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून नागेश सुरज वाघमारे (रा.विजापूर नाका झोपडपट्टी क्र.१) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जाधव हे करीत आहेत.

## बुरखाधारी महिलांनी दागिने पळविले

**सोलापूर** : जुना विजापूर नाका येथील दर्शना ज्वेलर्स मध्ये दोन अनोळखी बुरखाधारी महिला येऊन दुकानातील कामगार बिपाशा यांना कानातील फुले दाखवण्यास सांगून व बोलण्यामध्ये गुंतत ठेवून दुकानातील ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे कर्णफुले,सोन्याची फिरकी,तीन घुंगरू व गुलाबी खडे असा ऐवज ट्रेमधून मुद्दामून लबाडीने चोरून नेले आहे.ही घटना ६ मे रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी आरती राहुल गांधी (वय-४५,रा.कोणार्क नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## निधनवृत्त...

### मुकुंदराव जाधव



**वेळापूर** : मळोली (ता. माळशिरस) येथील मुकुंदराव भगवानराव जाधव यांचे वयाच्या ६४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. ते मळोली विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे संचालक होते.

### आय्युब मण्यार



**सांगोला** : सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे सेवानिवृत्त पर्यवेक्षक, विद्यार्थीप्रिय क्रीडाशिक्षक आय्युब मण्यार (वय ६७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, भाऊ असा परिवार आहे.

### विलासराव हांडे



**अक्कलकोट** : फुटाणे चाळ खासबागेतील सार्व. बांधकाम विभागाचे माजी उपअभियंता विलासराव भिमराव हांडे यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेऊन उच्च शिक्षण पूर्ण केले. ते ५८ वर्षा चे होते.त्यांच्या पश्चात आई,पत्नी, दोन मुली,एक मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### मंगल गायकवाड



**अकलूज** : वाघोली तालुका माळशिरस येथील सौ मंगल श्रीमंत गायकवाड यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले. त्यांचे पश्चात पती, तीन विवाहित मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे.

### ललिता जाधव



**सोलापूर** : जुळे सोलापूर, रजनी पार्क येथील रहिवाशी ललिता अर्जुन जाधव यांचे रविवारी दुपारी निधन झाले. त्या ५४ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना असा परिवार आहे. कॅनडा स्थित निखिल जाधव यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्यावर सायंकाळी मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# रिस्पेक्ट देतो याचा अर्थ हलगर्जीपणा चालणार नाही

**सुराज्य/अक्कलकोट**

**मी नेहमीच अधिकाऱ्या पासून ते शिपाई पर्यंत सर्वांनाच रिस्पेक्ट देतो याचा अर्थ विकास कामात हलगर्जीपणा चालणार नाही. आपापल्या विभागाचे कामे वेळेवर, दर्जेदार करा. अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा वजा तंबी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.**

ते पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित केलेल्या मातोश्री पाणंद रस्ता, व जलजीवन पाणी पुरवठा योजनेच्या आढावा बैठकीत बोलत होते. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी तहसीलदार बाळासाहेब सिरसट, गटविकास अधिकारी सचिन खुडे,माजी सभापती महिबूब मुल्ला, मोतीराम राठोड, जिल्हा परिषदेचे पाणी पुरवठा उपअभियंता सुनील कटकधोंड, सहायक गटविकास अधिकारी जोस्तना मुळीक, दक्षिण गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, कृषी अधिकारी उमेश काटे, आदीजण उपस्थित होते.

सदर बैठकीत प्रत्येक गावचे अडीअडचणी जाणून घेतले. पाणी पुरवठा कामात ६१ गावात आलेले विविध प्रकारचे अडचणी वेळीच सोडवणूक करू.अशी ग्वाही आमदार व अधिकारी यांनी सरपंच व ग्रामसेवक याना दिली.याप्रसंगी तालुक्यातील ग्रामसेवक, शाखा अभियंता, सरपंच, बहुसंख्येने उपस्थित होते.

मातोश्री पाणंद रस्ता, जलजीवन मिशन पाणी पुरवठा कामात हलगर्जीपणा नको. वेळ पडले तर पूर्णपणे चौकशी लावू. बोगस, चुकीचे कामे नको. अशी तंबी आ कल्याणशेट्टी यांनी दिली. १०९ पैकी ४८ गावचे काहीच अडचण नाही. जून

## आ. कल्याणशेट्टी यांची तंबी

अखेर पर्यंत कामे पूर्ण होतील . ६५ आदी ठिकाणी काही अडचणी आहेत. अशी माहिती अधिकार कटकधोंड यांनी दिली. कामात लोकल ब्रँड वापरू नका, चांगले उच्च दर्जाचे साहित्य वापरा. अशी सूचना आमदार यांनी



गावात तक्रार असून ते टप्पाटप्प्याने मार्गी लागतील. यामध्ये प्रामुख्याने चपळगाववाडी, दोड्याळ,इब्राहिमपूर, हिळळी, कुरनुर, कंठेहळळी, किरनळळी, मराठवाडी, पालापूर, दिली. शाखा अभियंता योगीराज बेंबळगी याना सांगवी येथील पाणी पुरवठा योजनेकडे दुर्लक्ष केल्याने आमदार यांनी धारेवर धरले. अरळी गावचे पाणी पुरवठा पाईपलाईन साठी

अक्कलकोट तालुक्यातील १०० गावात योजना सुरू असून ९४ गावचे इस्टीमेट पूर्ण झाले आहे. सोलापूर जिल्ह्यात पहिल्यांदाच जवळपास ८५५ गावात निधी मंजूर झाला आहे. प्रत्येक घराला नळाद्वारे पाणी पुरवठा करणे केंद्रशासनांचे उद्देश आहे. कामात पारदर्शकता आणू. ज्या ठिकाणी अडचणी आहे. तेथे आम्ही सहभाग होऊन दूर करू. वर्क ऑर्डर झालेले कामे वेळेत पूर्ण करा. त्याचे नियोजन करा. अशी सूचना उपअभियंता अधिकारी सुनील कटकधोंड.यांनी दिली.

येण्यात आलेले खड्डा वरच्या वर घेतल्याचे तक्रार ग्रामस्थांनी मांडले. याची दखल घेत आ. कल्याणशेट्टी यांनी चौकशीचे आदेश दिले. यामुळे तालुक्यात जलजीवन कामात होत असलेल्या बोगसगिरीचे बिंग फुटणार आहे.

## साचेबद्ध चौकट मोडणारा 'अंब्रेला' ९ जूनला भेटीला

**सोलापूर** : एक साचेबद्ध चौकट मोडणारा मराठी चित्रपट 'अंब्रेला' येत्या ९ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येतोय! विषयाच्या वेगळ्या मांडणीची प्रेक्षकांची भूक या चित्रपटातून नक्कीच भागेल ! ग्रामीण कथानक असणाऱ्या चित्रपटांमध्ये गावचा रांगडा पाटील,त्याची दुष्कृत्य आणि त्यातून गावकऱ्यांना होणारा जाच अशा मांडणीची सवय झालेल्या मराठी सिनेरसिकांना या चित्रपटात मात्र सरप्राईज मिळणार आहे.अभिनेता अभिषेक सेठीया आणि अभिनेत्री हेमल इंगळे यांच्यातल्या प्रेमाची केमिस्ट्री प्रेक्षकांना चित्रपटात पाहायला मिळणार आहेच.पण अरुण नलावडे आणि सुहिता थत्ते यांच्या कसदार अभिनयाची मेजवानीही प्रेक्षकांना चित्रपटाचा पुरेपूर आनंद देणारी ठरेल.

# टाकळीत श्रीचौडेश्वरी केसरी दोन पैलवानमध्ये विभागून

## मार्गचे संतोष पवार यांच्याकडून चांदीची गदा दिली भेट

**सुराज्य/द. सोलापूर**

टाकळी येथील ग्रामदैवत श्री. चौडेश्वरी देवीच्या यात्रेनिमित्त कुस्तीचा आखाडा भरविण्यात आला होता. या कुस्ती फडाचे उदघाटन मार्ग फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार यांनी केले आणि प्रथम क्रमांकाच्या कुस्तीसाठी त्यांनी चांदीची फिरती गदा यात्रा कमिटीला दिले. मात्र प्रथम क्रमांकाची कुस्ती बरोबरीत सुटली.

येथील चौडेशवरी देवीची यात्रा रात्री बाळबट्टल मिरवणूक, दिवसा सुवासिनींचा जलकुंभाच्या मिरवणुकीनंतर मुर्तीला जलमहारूद्राभिषेक झाली. देवीची मिरवणूक काढण्यात आले. देवीच्या पुजाऱ्याकडून नैवेद्य कुंभ आदी धार्मिक कार्यक्रम झाले असून दरम्यान कन्नड आणि जंगी मल्लांच्या कुस्तीने यात्रेची सांगता. शेवटची प्रथम क्रमांकाची एकवीस हजार



रूपये इनामाची कुस्ती मार्ग फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार यांच्याकडून लावण्यात आले. आणि या कुस्तीसाठी चांदीची फिरती गदाही त्याने येथील यात्रा कमिटीला दिले. लहान मोठे जवळपास दोनशे कुस्त्या झाल्या. अंतिम कुस्ती मंद्रुपचा प्रभाकर व्हनमाने आणि सोलापूरचे नागनाथ शिंदे या दोघामध्ये लावण्यात आले होते.

पण दोघेही तुल्यबळ पैलवान असल्याने बराच वेळ दोघांमध्ये झटापट सुरू होती. यामुळे यात्रा कमिटीने अखेर ही कुस्ती बरोबरीत सोडवली. ऑर्केस्ट्राचे उदघाटन एमके फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनूरे यांनी केले तर नाटकाचे उदघाटन संजय मदूरे लाड यांनी केले. लहान मुलांच्या कुस्ती उदघाटन बारामतीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बिरप्पा लातूरे व सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण वडरे यांनी केले. याप्रसंगी मार्गचे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार, नांदणीचे सरपंच शिवानंद भंडे, प्रा. आसिफ यत्नाळ, सतिष कोळी, हणमंत दिवटे, सागर कलशेट्टी, गुरूशांत भिंगोळे, द्रड्डप्पा आणची, चंद्रशेखर गायगवळी, निरंजन मोरे, शरणप्पा दुधभाते, राजशेखर बिराजदार, राजू बगले, दयानंद दुधभाते, महांतेश बिराजदार, उपसरपंच सिध्दाराम घोडके, डॉ. उमेश सुरळे, दयानंद कलशेट्टी, लक्ष्मण गौडगावकर, सुरेश दिवटे, उमेश कोंजारे, ड. राजकुमार म्हात्रे आदी उपस्थित होते.

## अक्कलकोट समर्थ नगर हद्दीत तीव्र पाणीटंचाई

# तब्बल पंचवीस दिवसाआड पाणीपुरवठा

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट शहरालगतच असलेल्या समर्थ नगर ग्रामपंचायत तब्बल पंचवीस दिवसांनी पाणीपुरवठा झाल्याने या भागातील नागरिक चांगलेच संतप्त झाले आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून ही समस्या असल्याने दाद मागायची कोणाकडे हा प्रश्न निर्माण झाला आहे.या भागात पूर्वीपासूनच किमान पंधरा दिवसाड या ठिकाणी पाणीपुरवठा आहे स्वतंत्र पाण्याची व्यवस्था नसल्याने अक्कलकोट शहराच्या पाणीपुरवठा विभागाकडूनच समर्थ नगर ग्रामपंचायतीला पाणीपुरवठा केला जातो.

काही वर्षांपूर्वी समर्थ नगर ग्रामपंचायत अस्तित्वात आली परंतु अनेक वर्षापासून या ठिकाणी नवीन पाणीपुरवठा योजना झाली नव्हती दीड वर्षांपूर्वी नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे त्याचे कामही सुरू असल्याचे सांगण्यात येते परंतु योजना कधी पूर्णत्वात जाणार आणि प्रत्यक्षात पाणी कधी मिळणार याचे

### ग्रामपंचायत ने टँकरद्वारे पाण्याची मागणी का नाही केली?

पाण्याची इतकी मोठी समस्या असताना ग्रामपंचायती टँकर व इतर सुविधांची मागणी का करत नाही.लोकांचे पाण्यासाठी प्रचंड हाल होत आहेत. मागे अनेक वेळा या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा झाला आहे अजून उन्हाळा जाणार बरेच दिवस बाकी आहेत. असे असताना टँकरद्वारे पाणीपुरवठा करून नागरिकांना दिलासा द्यावा,अशी मागणी केली जात आहे.



उत्तर कोणाकडेच नाही.

सध्या तरी या समर्थ नगर ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे नागरिकांतून प्रचंड संताप व्यक्त होत आहे. उन्हाळ्याचे दिवस आहेत प्रत्येकाला पाण्याची गरज आहे असे असताना पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे असलेले पंधरा दिवसाड पाणी देखील वीस ते पंचवीस दिवसांनी मिळाले आहे याबाबत चौकशी केली असता पाईपलाईन फुटली ,लाईट व्यवस्थित नव्हती अशी विविध प्रकारची मोघम उत्तरे दिले जात आहेत.समर्थ नगर ग्रामपंचायत म्हणजे अक्कलकोट शहराचा पूर्णपणे हद्द वाढ आहे या हद्दवाढ भागात पाण्याची खूप मोठी अडचण आहे याकडे आता गांभीर्याने कोण पाहणार आणि

पाण्याची समस्या लवकरात लवकर कोण मिटवणार हा देखील खरा प्रश्न आहे.येथील नागरिकांकडून लाखो रुपये पाणीपट्टी व इतर कर घेतला जातो परंतु अत्यावश्यक असलेले पाणी मात्र पंधरा ते वीस दिवसाड दिले जाते.



## स्पर्धा परीक्षेचे कथानक असणारा मुसंडी ९ जूनला प्रदर्शित

**सुराज्य/सोलापूर**

एमपीएससी आणि यूपीएससी यासारख्या स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या तरुणांच्या जीवनावर आधारित मुसंडी हा नवा चित्रपट ९ जून रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार असल्याचे निर्माते गोवर्धन दोलताडे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

स्पर्धा परीक्षेची तयारी करणं आणि ती यशस्वीरीत्या पास करणं हा प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा असतो. यावर भाष्य करणारा सोनाई फिल्म क्रिएशन प्रस्तुत, गोवर्धन दोलताडे लिखित-निर्मित आणि शिवाजी दोलताडे दिग्दर्शित 'मुसंडी' हा चित्रपट बनला आहे.

रोहन पाटील आणि गायत्री जाधव ही जोडी मुसंडी' चित्रपटात प्रमुख भूमिकेत असून या दोघांसोबत सुरेश विश्वकर्मा, शुभांगी लाटकर, तान्हाजी गळगुंडे, शिवाजी दोलताडे, सुरज चव्हाण, अरबाज शेख, प्रणव रावराणे,अक्षय टाक, घनश्याम दरवडे (छोटा पुढारी),सनमीता धापटे, वैष्णवी शिंदे,माणिक काळे,सुजीत मगर,मयुर झिंजे,ऋतुजा वावरे,विकास वरे,राधाकृष्ण कराळे,राम गायकवाड,अजित पवार,उत्कर्ष देशमुख,सार्थक वाईकर,आर्यन पवार,निमिशा सानप,रुचिता देशमुख,प्रियंका पवार,ऐश्वर्या फटांगरे,श्रद्धा गायकवाड,सोनाली गायकवाड,आकांक्षा कापे,प्राजक्ता गायकवाड, मानसी डरंगे,भाग्यश्री पवार यांच्या भूमिका आहेत.

या पत्रकार परिषदेत अभिनेता रोहन पाटील,निर्माते गोवर्धन दोलताडे,सुरज चव्हाण,घनश्याम दरवडे आदि उपस्थित होते.

# अहिल्यादेवींच्या जीवनावर येणार चित्रपट

## अकलूज येथे साकारल्या जाणाऱ्या चित्रपटातून इतिहासाचे अचूक दर्शन व्हावे : धैर्यशील

**सुराज्य/अकलूज**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य समस्त मानव जातीसाठी प्रेरणादायी आहे त्यांच्या जीवनावर आजपर्यंत अनेक मालिका निघाल्या पण चित्रपट आला नाही आता महाराष्ट्रात प्रथमच अकलूज येथून हा चित्रपट साकारला जाणार असून याचा अभिमान आहे पण प्रस्तुतकर्त्यांनी चित्रपट बनवताना चित्रपटाच्या माध्यमातून इतिहासाचे अचूक दर्शन झाले पाहिजे, इतिहासाचे विडंबन होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे असे मत भाजप नेते धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.**

लयभारी प्रोडक्शनच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची यशोगाथा दाखविणा-या चित्रपटाची घोषणा शंकरनगर-अकलूज येथील स्मृती भवनात झालेल्या कार्यक्रमात भाजपा नेते धैर्यशील मोहिते-पाटील,अहिल्याबाईच्या प्रमुख भूमिकेत असणाऱ्या असणारी अभिनेत्री अश्विनी महांगडे,अभिनेते सुरेश विश्वकर्मा,संजय खापरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली.त्याप्रसंगी धैर्यशील मोहिते-पाटील बोलत होते. प्रास्ताविकात निर्माता दिग्दर्शक सुशांत सोनवणे यांनी या चित्रपट निर्मिती मागील भूमिका स्पष्ट केली.

यावेळी पुढे बोलताना मोहिते पाटील म्हणाले की,आजच्या डिजिटल युगात आपली पुढील पिढी केंद्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यापीठात शिकत आहे.या विद्यापीठात महाराष्ट्राचा इतिहास नगण्य आहे.पुढील पिढीला महाराष्ट्राचा अभिमानास्पद इतिहास कळण्यासाठी मालिका व चित्रपट हिच प्रभावी माध्यम ठरत असून पुण्यश्लोक



आहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर अकलूजमधून निघणारा चित्रपट नक्कीच पुढील पिढीला प्रेरणादायी ठरेल

यावेळी बोलताना अभिनेत्री अश्विनी महागडे म्हणाल्या, अहिल्यादेवी होळकर यांच्यावर निघणाऱ्या चित्रपटात महत्त्वाची भूमिका माझ्याकडे असून मी ती जबाबदारीने पार पाडेन.माझ्यातले सर्वात चांगले ते देण्याचा प्रयत्न करीन.हा चित्रपट पुढील पिढीला दैदीप्यमान इतिहासाची फक्त माहिती देणार नसून त्यातून प्रेरणा घेत महिलांनी सक्षम बनवावे अशी आपली इच्छा असल्याचे सांगितले.

यावेळी संजय खापरे यांनी अकलूजमध्ये मोहिते पाटील कुटुंबीयांमुळे सर्व कलांना राजाश्रय व लोकाश्रय मिळत असतो.चित्रपट नक्कीच यशस्वी होईल अशी आशा व्यक्त केली. यावेळी सुरेश विश्वकर्मा यांनीही या चित्रपटात शुभेच्छा देत आपला आणि अकलूजचा फार जुना संबंध असून अकलूजमध्ये कलेला दाद देणारे नेतृत्व व रसिकजण असल्याचे सांगितले. सदर चित्रपटाची शूटिंग लवकरच सुरू होणार असून यामध्ये बहुतांश कलाकार हे अकलूज परिसरातील असल्याचे व चित्रपटासाठी गुरु ठाकूर यांच्याकडून गीते लिहून घेतली जाणार असल्याचे सोनवले यांनी सांगितले.

# गौतमी पाटीलसाठी १०६ पोलिसांचा सशुल्क बंदोबस्त

## घेरडी कार्यक्रमात व्यत्यय नको म्हणून केला ५ लाखांचा खर्च


**सुराज्य/सांगोला**

राज्यातील तरुणाई मध्ये प्रचंड लोकप्रिय असलेल्या गौतमी पाटील यांच्या लावणी कार्यक्रमासाठी घेरडी (ता. सांगोला) येथील राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश सरचिटणीस सोमा आबा मोटे यांनी कार्यक्रमात तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला होता या कार्यक्रमात १०६ पोलिसांचा सशुल्क बंदोबस्त तैनात करण्यात आला होता

गौतमी पाटीलच्या नुसत्या नावानेच प्रचंड गर्दी जमते. दरम्यान, या गर्दीत राडा होऊन कार्यक्रमात व्यत्यय येऊ नये म्हणून १०० पोलीस कर्मचारी आणि ६ अधिकारी अशा १०६ पोलिसांच्या बंदोबस्तांसाठी घेरडी येथील या कार्यक्रमास तब्बल ५ लाख रुपये मोजले आहेत.

घेरडी येथे राष्ट्रीय समाज पक्षाचे सरचिटणीस सोमा मोटे यांच्या वाढदिवसानिमित्त रात्री या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस बंदोबस्त मोठा असल्याने या कार्यक्रमात कुठलीही अनुचित घटना घडली नाही हा कार्यक्रम शांततेत पार पडला या कार्यक्रमाला सांगोला व जत तालुक्यातील हजारो प्रेक्षक उपस्थित होते.

संपूर्ण राज्यभर गौतमी पाटील तुफान लोकप्रिय होऊ लागली आहे. यापूर्वी सांगोला तालुक्यातील चोपडी, महुद सह अन्य भागात गौतमी पाटीलच्या कार्यक्रमात प्रचंड गर्दी जमली होती.





## अन्नछत्र मंडळात लाखो भक्तांना रोज महाप्रसादाचा लाभ : खैरे

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले अन्नछत्र मंडळात लाखो भक्तांना रोज महाप्रसादाचा लाभ मिळतो, ही बाब खूप पुण्याची असल्याचे मनोगत संभाजीनगरचे (औरंगाबाद) माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी व्यक्त केले.

ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत शिवसेना ठाकरे गटाचे सोलापूरचे नेते अमर पाटील, अरुण लोणारी हे उपस्थित होते.

यावेळी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



## भेद निवळवून मांगल्य निर्माण करते ती कविता : कवी औटी

**सोलापूर** : आजच्या कमालीच्या अविश्वासार्ह, उच्छंखल अशा अवघड कालखंडातून आपण सारे जात आहोत .समाज माध्यमांची सहज उपलब्धता, चकाधौक,रस्त्यातली वाहनांची,डोक्यातली विचारांची वाढती वेगवान गतीआणि भर गर्दीतही माणुस एकलकोंडा व नैराश्याच्या गर्तेत ढकलला जातोय. यातून समाज विघातक घटना समोर येत आहेत. समाजाचा चेहरा भेसुर होतो आहे. नैतिक अनैतिकतेच्या रेषा पुसट होण्याच्या या अतिशय नाजूक क्षणी संवेदनशील माणूस गोंधळून जातो आहे .अशावेळी संभ्रमशील मनाला कविताच योग्य मार्ग दाखवु शकते. भेद निवळवून सौहार्द ,प्रेम, श्रद्धा ,मांगल्य निर्माण करते तीच खरी कविता . आणि अशी कविता आपल्या पूर्वसुरींनी म्हणजेच संतांनी आपल्याला गुप्तधन म्हणून आंदन दिलेली आहे, असे उद्गार जेष्ठ कवी देवेंद्र औटी यांनी काढले. अक्कलकोट येथील ऐतिहासिक श्री स्वामी समर्थ राजेराय मंदिरात सद्गुरु बेलानाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाच्या समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कवी औटी यांचा समर्थांची शाल, पुष्पहार श्रीफळ देऊन सत्कार करणेत आला. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष अड. शरद फुटाणे, डॉ. विश्वनाथ जाधव, उपस्थित होते. यावेळी नवोदितांनी कविता सादर केल्या. याप्रसंगी डी. एस. जयदेव, अड. अनिल मंगरुळे, दत्तात्रय मोरे, भुवनेश वर्दे, श्रीमती वत्सला मोरे, बिल्वराज नाबर, विजयकुमार गाजुल, राजकुमार रामन, आदि पदाधिकार्यांसह भाविक उपस्थित होते.

## राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशालेचा धावणे वक्तृत्व स्पर्धेत राज्यात प्रथम



**मोहोळ** : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळ संघ, मुंबई आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत येथील राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशालेचा विद्यार्थी प्रसाद अजय धावणे याने पाचवी ते सातवी गटामध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य गोविंद पाटील यांचा तो पुतण्या आहे. प्रसादच्या या यशाने प्रशालेची राज्यात प्रथम येण्याची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

त्याच्या यशस्वीतेसाठी सह शिक्षिका सिंधू वाघचवरे, विद्या देशमुख, सह शिक्षक लक्ष्मण क्षिरसागर, रावसाहेब सुर्वे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या यशा बद्दल कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य गोविंद पाटील,सहशिक्षक संदीप गायकवाड, सुनिता रोकडे,अजय धावणे संजय धावणे, धनंजय धावणे, यांनी तसेच शहरासह तालुक्यातून सर्वत्र कौतुक होत आहे.

# दुधदर कपातीच्या निषेधार्थ महिला शेतकऱ्यांचा दुग्धाभिषेक

### सर्वपक्षीय रास्ता रोको आंदोलन ; दर ३८ वरून ३२ रूपयांवर

सुराज्य/सोलापूर

उन्हाळ्यात दुध आणि दुग्धजन्य पदार्थाला चांगली मागणी असतानाही दुधाच्या दरात कपात केली जात आहे. खाजगी दुधसंघांनी गेल्या २० दिवसांत गाईच्या दुधात सुमारे चार ते पाच रुपयांनी घट केली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून टिकून असलेला गाईच्या दुधाचा ३८ रुपयांचा दर घसरून ३२ रुपयांवर आला आहे. या संघांच्या मनमानी कारभाराविरोधात दुध उत्पादक महिला शेतकरी रस्त्यावर आल्या असून या अन्यायकारक निर्णयाच्या निषेधार्थ महिला शेतकरी विश्रांती भुसनर यांच्या सह दुध उत्पादकांनी दुग्धाभिषेक करून निषेध व्यक्त केला.

खाजगी दुध संघांनी केलेल्या दर कपातीचा निषेध करण्यासाठी पंढरपूर तालुक्यातील उपरी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. राज्यसरकारचे दूध व्यवसायाकडे दुर्लक्ष आणि दूधधंदा बड्या प्रकल्पांच्या नियंत्रणाखाली गेल्याने विलक्षण चढउतार येत आहेत. दुधाला चांगले दर मिळू लागल्याने लाखो रुपये खर्चून गोठे उभारले होते. परंतु दुधाचे दर ३७ ते ३८ रुपये लिटरहून ३४ ते ३३२ रुपये लिटरवर घसरले आहेत. यामुळे दूध उत्पादक धास्तावले आहेत.



- खाजगी संघांच्या मनमानी विरोधात शेतकऱ्यांनी दिल्या निषेधाच्या घोषणा.
- गेल्या तीन महिन्यांपासून दुधाला प्रतिलिटर ३८ रुपये दर मिळाले.
- गेल्या काही दिवसांपासून ५ रूपये दर कपात
खाजगी दुध संघाचे अध्यक्ष दशरथ मानेच्या निषेधार्थ घोषणाबाजी.
- दूध व दुग्धजन्य पदार्थांना वाढती मागणी. शिवाय, उन्हामुळे साधारण १० टक्के दूध उत्पादनात घट. तरीही दर कमी. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट
- भेसळीचे दूध, भ्रष्टदूध संघवाल्यांमुळे दुध व्यवसायाचे वाटोळे
- दुधाच्या दराबाबत शासनाने ठोस भूमिका घेणे गरजेचे मात्र शासनही दुर्लक्ष.

कोरोना व लंपीच्या वादळात दूध उत्पादकाचे कंबरडे मोडले होते. मात्र, मागील काही महिन्यात प्रतिलिटर ३७ ते ३८ रुपये दर मिळाल्याने तो सावरला. अगदी पंजाब, हरियाना, बेंगलोर येथे जाऊन सव्वा ते दीड लाखाच्या गाई खरेदी करून गोठे वाढविले होते. मात्र, एप्रिलमध्ये केंद्रसरकारने गरज पडल्यास दुग्धजन्य पदार्थ आयात केले जातील, असे सांगितले आणि अस्थिरता आली. आता जागतिक बाजारात दर पडलेल्या पदार्थांची आयात झाली तर धंदा कोलमडेल अशी भीती स्थानिक प्रकल्पांना आहे. महाराष्ट्राचा दूध व्यवसाय तर निवडक प्रकल्पांच्या हाती गेला असून त्यांनी दूधखरेदी दरात घट करायला सुरवात केली आहे. मोजक्या व्यावसायिकांनी अमूलच्या स्पर्धेसाठी कसरत करत ३६ रुपयांवर दर दाबून ठेवले आहेत. सरकारकडून हस्तक्षेप न झाल्यास दर आणखी घसरण्याची शक्यता आहे.

दूध पुरवठा कमी असतानाही दरात घसरण सुरुच

वाढत्या तापमानामुळे उन्हाळ्यात दुध उत्पादन कमी होते.याचा फटका शेतकऱ्यांना बसतो.परंतु दर स्थिर असतात. यंदा मात्र दुध संघांनी ऐन उन्हाळ्यात दुधाचे दर कमी केल्याने शेतकरी हतबल झाला आहे.

यापूर्वी ही दूध दरासाठी राज्यात आंदोलन करून संप करावा लागला होता. दुधाचे दर सातत्याने अस्थिर ठेवून दूध उत्पादकांना अडचणीत आणले जात असल्याचा आरोप सातत्याने होत आहे.राज्यात साधारण ७० सहकारी व ३०० पेक्षा खासगी दूध संघाद्वारे दोन ते सव्वादोन कोटी लिटर दुधाचे संकलन होते. त्यातील ४० टक्के दुधाची पावडर, बटर व अन्य दुग्धजन्य पदार्थ तयार होतात. तर ६० टक्के दूध ग्राहकांना पाउचमधून विकले जाते.

गेल्या अनेक वर्षानंतर यंदा साधारण चार ते पाच महिन्यांपासून दुधाचे दर वाढले. पशुखाद्य व अन्य बाबींचा विचार केला तर सध्या मिळणारे दुधाचे दर बरे आहेत, असे सांगत दूध उत्पादक काहीसे समाधानी होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून दूध दरात पुन्हा कपात सुरु झाली आहे.

**...निर्णय न बदलल्यास आंदोलन उग्र करू.**

उन्हाळ्यात दुधाचे दर वाढण्याएवजी कमी होत आहेत. अडचणीवर मात करत दूध व्यवसाय शेतकऱ्यांनी टिकवला. पण आता चांगले दर मिळू लागताच दर पाडण्याचे षडयंत्र रचले आहे. संघाच्या दुधाच्या विक्रीचे, दुग्धजन्य पदार्थांचे दर कायम असताना दूध दर पाडून शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळ सुरु केला आहे. दूध उत्पादकांनी संघर्षाची तयारी ठेवून रस्त्यावर उतरले तरच न्याय मिळेल. सरकारने ऊसाच्या एफआरपी सारखा दुधाला एफआरपी देणे गरजेचे आहे. तरच दुध उत्पादक शेतकरी जगेल.४० रूपये दर पुर्ववत न केल्यास जिल्ह्यात दुधाचे टँकर फिरू देणार नाही.

– **दिपक भोसले** (रयत क्रांती संघटना)

## चार जागा न दिल्यास सर्व ४८ उमेदवार उभे करणार : जानकर

सुराज्य/सांगोला

लोकसभेसाठी माढा बारामती सांगली आणि परभणी या चार जागा भाजपला मागणार आहे या चार जागा न दिल्यास महाराष्ट्रातील सर्व ४८ जागावर उमेदवार उभे करणार असल्याचा इशारा रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी दिला



राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर सांगोल्यात आले होते यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते यावेळी बोलताना जानकर म्हणाले भाजपने आधी मित्र पक्षांना धोका दिला आहे गेल्या लोकसभेला त्यांनी आम्हाला जागा दिली नाही विधानसभेलाही डावलण्यात आले भाजपाने यावेळी सन्मानाने आम्ही मागतो त्या जागा दिल्या तर भाजप सोबत जाऊ अन्यथा सर्व ४८ जागावर लढण्याची तयारी केली जाईल मी स्वतः परभणी माढा किंवा उत्तर प्रदेश मधील मिर्जापुर येथून लोकसभेची निवडणूक लढविण्यास उत्सुक असल्याचे जानकर यांनी सांगितले गेल्या वेळी भाजपने धोका दिला लोकसभा विधानसभेला जागा दिल्या नाहीत यंदा आमचा विचार न केल्यास आम्ही निर्णय घेण्यास सक्षम असल्याचेही यावेळी जानकर यांनी सांगितले

## म्हाडा कॉलनीत १५ दिवसाआड पाणी पुरवठा: नागरिकांचे हाल

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट शहर हद्दीत असलेल्या वार्ड १० मधील म्हाडा कॉलनीत तब्बल १५ दिवसानी पाणी पुरवठा होत असल्यामुळे नागरीकांचे खुप हाल होत असून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ऐन उन्हाळ्यात महिन्यातून केवळ दोनवेळाच पाणी सोडले जात आहे. पाणी असून देखील कधी मोटर जळते,कधी पाईप फुटते तर कधी लाईट नसते; अशा कारणामुळे वारंवार कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होत आहे. पाणी पुरवठा विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे येथील लोकांमध्ये तीव्र संताप आहे. इतकी पाणी टंचाई असतानाही संबंधित अधिकारी मात्र याकडे लक्ष द्यायला तयार नाही. त्यामुळे आता येथील नागरीक तीव्र आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

## विज्ञान महाविद्यालय सांगोलाचे नाव आता डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय

सुराज्य/सांगोला

सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला जिल्हा सोलापूर या संस्थेअंतर्गत सांगोला येथे सुरू असलेल्या विज्ञान महाविद्यालय सांगोला या महाविद्यालयाचे नाव बदलून डॉक्टर गणपतराव देशमुख महाविद्यालय असे करण्यात यावे यासाठी मागील वर्षभरामध्ये मागणी सुरू होती. सदरच्या मागणीस राज्य शासनाने मंजुरी दिली असून २०२३-२४ पासून विज्ञान महाविद्यालय सांगोला चे नामकरण हे डॉक्टर गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला असे करण्यात आले आहे.

सांगोला तालुक्यामधील बस स्थानक परिसरात असणाऱ्या सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला या संस्थेच्या विज्ञान महाविद्यालय सांगोला या महाविद्यालयाच्या नावात बदल करून डॉक्टर गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला असे करण्यात यावे अशी मागणी मागील वर्षभरामध्ये सुरू होती. सदरच्या मागणीला राज्य शासनाने महाविद्यालयाच्या नावातील बदल हा फक्त त्या बाबी पुरता मर्यादित असून या बदलामुळे त्या महाविद्यालयास यापूर्वी प्राप्त मूळ शासन मान्यतेत बदल होणार नाही व अशा नाव बदलामुळे शासनावर कोणतेही अतिरिक्त दायित्व निर्माण होणार नाही या अटी व नियमांच्या अधीन राहून सदरचा बदल केला आहे.

## नगरपंचायत कर्मचाऱ्यांचे समावेशन होण्याची मागणी

सुराज्य/नातेपुते

माळशिरस तालुक्यातील ग्रामपंचायती नवनिर्मित नगरपरिषद तसेच नगरपंचायतीत रूपांतर झालेल्या आहेत. यामध्ये ग्रामपंचायत कार्यकाळात सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार समावेशन होण्याची मागणी शिवसेनेचे माळशिरस तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.



माळशिरस तालुक्यात अकलूज, नातेपुते व श्रीपूर महाळुंग यांचे नगरपरिषद व नगरपंचायतीत नव्याने रूपांतर झाले आहे. ग्रामपंचायत कार्यकाळात सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे समावेशन अंतिम टप्प्यात आले आहे. त्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये. सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांचे योग्य समावेशन व्हावे. अशा मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सचिव नगर विकास व संबंधित विभागांना पाठविण्यात आले आहे.

## खर्डी येथे दोन लाखांची चोरी

सुराज्य/सोलापूर

खर्डी येथे बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने घरातील पिशवीतील २ लाख रुपयाचे दागिने पळवले. चोरी शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली .

यासंदर्भात विजय जगन्नाथ घाडगे (रा. खर्डी) यांनी पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. ते शुक्रवारी रात्री बाहेर गेले होते . चोरट्याने पहाटेच्या सुमारास दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. आणि भिंतीच्या खुंटीस टांगलेल्या पर्समधून ४० ग्रॅम सोन्याचे तर १०० ग्रॅम चांदीचे दागिने चोरून नेले . अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार नलवडे पुढील तपास करीत आहेत .

## रिपाइंच्या शिर्डीतील महाअधिवेशनास सांगोल्यातून कार्यकर्ते जाणार : सातपुते

सुराज्य/सांगोला

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या २८ मे रोजीच्या शिर्डी येथे आयोजित राज्यस्तरीय महाअधिवेशनास सांगोला तालुक्यातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते घेऊन जाणार असल्याची माहिती आरपीआयचे तालुकाध्यक्ष खंडू सातपुते यांनी दिली.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) पक्षाच्यावतीने २८ मे रोजी सायं. ५ वाजता कांदा मार्केट, राहता रोड शिर्डी येथे राज्यस्तरीय महाअधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले असणार असून उद्घाटक म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील असणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे असणार आहेत.

या मेळाव्याला राष्ट्रीय कार्यकारिणी तसेच राज्य कार्यकारिणी, प. महाराष्ट्र कार्यकारिणी यांच्यासह सर्व जिल्हा व तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. ही बैठक प. महाराष्ट्र सरचिटणीस जितेंद्र बनसोडे, प. महाराष्ट्र सचिव तथा सांगोला तालुका पक्षनिरीक्षक चंद्रकांत वाघमारे, सोलापूर जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, जिल्हा सरचिटणीस रवि गायकवाड यांच्या आदेशाने घेण्यात आली. या बैठकीला जिल्हा कार्याध्यक्ष विक्रमदादा शेळके, जिल्हा उपाध्यक्ष दिगंबर गवळी, जिल्हा चिटणीस सतिश(दाऊद) काटे, मातंग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष दामोदर साठे, प. महाराष्ट्र नेते आण्णासाहेब गरस्ते, बैठकीला उपस्थित होते.

## आपत्ती प्रवण क्षेत्रातील सर्व यंत्रणेने सज्ज रहावे

### अक्कलकोट येथे मान्सूनपूर्व तयारीबाबत आढावा बैठक

सुराज्य/अक्कलकोट



लवकरच पावसाळा सुरू होणार आहे त्यामुळे आपत्ती प्रवण क्षेत्रातील सर्व यंत्रणेने सज्ज राहावे, अशा सूचना सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिल्या आहेत.

मान्सूनपूर्व तयारी २०२३ या अंतर्गत अक्कलकोट येथील तहसील कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. त्यावेळी

त्या बोलत होत्या.तहसीलदार बाळासाहेब सिरसट हे व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना आव्हाळे म्हणाल्या की, तालुक्यातील सर्व विभागाच्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्यामध्ये आपत्ती काळात उपयोगात येणारे पर्यायी रस्ते व मार्ग यांचा आराखड्यामध्ये समावेश करावा,आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडावी, २०२०,२०२१, २०२२ मधील आलेला अनुभव लक्षात घेऊन कार्यवाही करावी, रस्त्याकडच्या झाडाच्या उपाययोजनासाठी संबंधित विभागास पत्रव्यवहार करावा, बोरी नदीकाठच्या गावातील पुलाचे सर्वेक्षण करण्यासाठी बोरी पाटबंधारे शाखा अक्कलकोट यांना सूचना देण्यात आल्या. नदीकाठच्या गावातील ग्रामसेवक व तलाठी यांना लेव्हल मार्क करण्याबाबत ही सूचना देण्यात आल्या आहेत.

**प्रभावी अंमलबजावणी केली जाईल**

आपत्ती व्यवस्थापन २००५ मधील उपायोजनानुसार तालुक्यातील सर्व यंत्रणा सज्ज ठेवू.मुळात एखादी घटना घडूच नये यासाठी योग्य ती खबरदारी घेतली जाईल.मान्सून पूर्वतयारी बाबत जिल्हास्तरावरून महत्त्वाच्या सूचना आल्या आहेत त्याची तंतोतंत अंमलबजावणी तालुक्यात केली जाईल.

– **बाळासाहेब सिरसट**, तहसीलदार

## ८४ वृद्धांचा सामुदायिक अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा

### लोंढेवाडीत अनोखा उपक्रम

### लोकसहभागातून साकारलेल्या सोनाई कृषीपर्यटन केंद्राचे लोकार्पण

सुराज्य/माढा



लोंढेवाडीसारख्या छोट्याशा गावातील ८० हून अधिक सत्तरी पार केलेल्या वृद्धांचा वाढदिवस केल्याने त्यांना जगण्याची नवी उमेद मिळणार आहे .सरपंच संतोष लोंढे आणि ग्रामस्थांनी आयोजिलेला हा अनोखा उपक्रम तरूणांना आदर्शवत आणि वृद्धांना नवी उमेद देणारा असल्याचे गौरवोदगार आमदार बबनराव शिंदे यांनी काढले.

लोंढेवाडी ता माढाचे सरपंच संतोष लोढे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी गावातील ८४ जणांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस मोठ्या उतसाहात साजरा केला.आमदार शिंदे यांच्यासह सुविद्य पत्नी कृषीभूषण सुनंदाताई शिंदे यांच्या हस्ते विठ्ठल रूक्मिनी ची मूर्ती भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. याचबरोबर माळरानावर उभा केलेल्या सोनाई कृषी पर्यटन स्थळाचे लोकार्पण यावेळी आमदार बबनराव शिंदे आणि शिवसेनेचे जिल्हा समन्वयक प्रा शिवाजीराव सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.प्रा शिवाजीराव सावंत यांनी आपल्या भाषणात आयुष्यभर पैसा कमवताना समाजहितासाठीही आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे.ज्या आई वडिलांनी आपल्याला लहानाचे मोठे केले त्यांची वृद्धापकाळात सेवा करून सत्कर्म करण्याचे आवाहन त्यानी केले.यावेळी पर्यटन स्थळाला आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी कृषीभूषण सुनंदाताई शिंदे, तहसीलदार विनोद रणवरे, पोलीस निरीक्षक भीमराय खंडागळे कृषीभूषण दादा बोडके, सत्यवान देशमुख, विष्णू बोडके, राजू गोटे, नितीन नकाते, प्रमोद लोंढे, शंकर मुळुक, बाळासाहेब इंगळे, सारिका लोंढे, तृप्ती चवरे, शोभा थोरात, समृध्दी आवारे, संदिपान बोबडे, रामहरी लोंढे, जालिंदर मुळूक, नरहरी लोंढे, नागनाथ घाडगे, सुरेश उपाध्ये, अमोल चवरे, भारत बोबडे, सचिन चवरे, सुरेश लोंढे, बाळू बोबडे, औदुंबर चवरे, शिवाजी घाडगे, दिलीप लोंढे, संजय बोबडे, परमेश्वर देवकर, सचिन घाडगे, राजू तांबोळी, सचिन बोबडे, विकास लोंढे, संपत मुळुक, दिलीप उपाध्ये, प्रताप घाडगे, पांडुरंग बोबडे, शहाजी शिंगाडे, श्रीरंग मोरे, नितीन गोरे आदि उपस्थित होते.

गावातील १०३ वर्षांचे जुने सहकारी संदिपान आबा बोबडे यांच्या घरी जाऊन आमदार बबनराव शिंदे यांनी यथोचित सन्मान केला.यावेळी आमदार शिंदेसाठी अहोरात्र झटणार्या बोबडे यांना अश्रू अनावर झाले होते.

---

गावच्या माळरानावर गावकऱ्यांच्या श्रमदानातून उभारलेल्या ऑक्सीजन पार्कचे आणि सोनाई कृषीपर्यटन केंद्राचे कौतुक करतानाच यासाठी आवश्यक ती आर्थिक मदत करण्यास कटिबद्ध आहे.सरपंच संतोष लोंढे यांच्या नेतृत्वाखाली चांगले काम होत असून यासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे आमदार बबनराव शिंदे व प्रा शिवाजीराव सावंत यांचे एकाच व्यासपीठारून आश्वासन.

## ओव्हरटेकवरुन बस चालकाला मारहाण

**अकोला** : अकोला जिल्ह्यातील शेगाव बाळापूर रस्त्यावर एका खासगी बस चालकाकडून म्हणजेच लक्झरी चालकांने शेगाव आगाराच्या एसटी बस चालकाला मारहाण केली आहे. या प्रकरणात अकोला जिल्ह्यातील बाळापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून लवकरच मारहाण करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात येईल, असं पोलिसांनी सांगितले. दरम्यान शेगाव आगारातून यवतमाळला जाण्यासाठी निघालेल्या शेगाव आगाराच्या बस चालकाला साईड देण्याच्या कारणावरून खामगाव येथील स्वामी ट्रॅव्हल्सच्या खासगी बस चालकाने बेदम मारहाण केली. ही घटना शेगाव ते बाळापूर दरम्यान घडली.

## तरुणीची ओढणीने गळफासाने आत्महत्या

**रायगड** : महावितरण कार्यालयात नोकरीला असलेल्या तरुणींने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. ही आत्महत्या नेमकी कोणत्या कारणामुळे केली? हे अद्याप समजू शकलेलं नाही. गोरेगाव येथे एका तरुणीने गळफास घेत आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. अभिलाशा अभिमन्यू शेळके (वय २८, रा. मूळ औरंगाबाद) असं या आत्महत्या केलेल्या युवतीचं नाव आहे. गेले जवळपास ३ ते ४ वर्षापासून ही तरुणी येथील महावितरण कार्यालयात कार्यरत होती. दरम्यान, आत्महत्येच्या आधी या तरुणीने एक चिठ्ठी देखील लिहिली असून ती गोरेगाव पोलिसांनी जप्त केली आहे. माझ्या आत्महत्येला कोणालाही जबाबदार धरु नये. हा निर्णय मी स्वतःहून घेतला आहे, असं तिने आपल्या आई-वडिलांच्या नावाने लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटलं आहे.

## १७ वर्षीय तरुणीची आत्महत्या

**जळगाव** : तालुक्यातील शिरसोली येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीने राहत्या घरात साडीने गळफास घेतल्याची घटना शनिवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली आहे. या घटनेने गावात खळबळ उडाली आहे. आत्महत्येचे नेमके कारण समोर आलेले नाही. एमआयडीसी पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तिची आई तसेच आजी हे मजुरी काम करुन उदरनिर्वाह भागवतात. शनिवारी सकाळी अल्पवयीन मुलीची आई तसेच आजी नेहमीप्रमाणे मजुरीच्या कामासाठी निघून गेले. यादरम्यान, अल्पवयीन ही घरात एकटीच होती. घरी एकट्या असलेल्या मुलीने साडीच्या सहाय्याने छताला गळफास घेऊन मृत्यूला कवटाळले.

## पोलीस अधिकाऱ्याला दणका

**मुंबई** : अँटॉप हिल पोलीस ठाण्यात दोन वकिलांना कथितरित्या वरच्या मजल्यावरील खोल्यांमध्ये डांबून बेदम मारहाण केल्याचा आरोप झाल्यानंतर या प्रकरणाची गंभीर दखल घेत या पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नासीर अहमद कमलपाशा कुलकर्णी यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. त्याचबरोबर चौकशीत हस्तक्षेप होऊ नये याद्दष्टीने त्यांची तत्काळ वाहतूक शाखेत बदलीही करण्यात आली आहे. अँटॉप हिल परिसरातील दोस्ती शॉपी लिंक इमारतीमधील एका वादाबाबत तक्रार करण्यासाठी ॲड. हरिकेश शर्मा व ॲड. साधना यादव हे गुरुवारी दुपारी पोलीस ठाण्यात गेले होते. त्यावेळी वादावादी झाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुलकर्णी व सहकारी पोलिसांनी हरिकेश व साधना यांना पोलीस ठाण्यातील वरच्या मजल्यावरील दोन वेगवेगळ्या खोल्यांत नेले आणि त्यांना लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

## धावत्या रेल्वेत वीज तयार करणार

**मुंबई** : पश्चिम रेल्वेने दोन पवनचक्की नायगाव आणि खार स्थानकांदरम्यान बसवल्या आहेत. रेल्वे धावताना त्याद्वारे निर्माण होणाऱ्या हवेतून पवनचक्कीद्वारे वीज निर्मिती करण्यात येणार आहे. सध्या हा पायलट प्रोजेक्ट म्हणून करण्यात आला आहे. हा प्रोजेक्ट जर यशस्वी झाला, तर रेल्वेकडून अशा मिनी पवनचक्की इतर रेल्वे स्थानकांतही बसवल्या जातील. हा देशातील अशाप्रकारे रेल्वे ट्रॅकवर पवनचक्की लावून वाऱ्याद्वारे वीज निर्मितीचा पहिलाच प्रकल्प असणार आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने हा प्रकल्प उत्तम ठरणार असल्याचं या प्रकल्पाचे प्रमुख सुमित ठाकूर यांनी म्हटलं आहे.

## महिला अधिकाऱ्याच्या घरी सापडले घबाड

**नाशिक** : लाचखोर जिल्हा हिवताप महिला अधिकाऱ्याच्या लॉकर्सची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तपासणी केली असता त्यामध्ये लाखो रुपयांचे सोने आढळून आले आहे. या सोन्याची शुक्रवारी दिवसभर पथकाकडून मोजणी सुरु होती. महिला अधिकाऱ्याकडे लाखो रुपयांचे सोने कोठून आले आहे, याचा शोध पथकाकडून घेतला जात आहे. जिल्हा हिवताप अधिकारी वैशाली दगडू पाटील (४९, रा. स्टेटस रेसिडेन्सी, गंगापूर, नाशिक), संजय रामू राव (४६, पाथर्डी फाटा, नाशिक), कैलास गंगाधर शिंदे (४७, पांडवनगरी, नाशिक) अशी तिघा लाचखोरांची नावे आहेत. तक्रारदार आरोग्यसेवकाचे मासिक वेतन काढून देण्यासाठी १० हजारांची लाच घेतलेल्या स्विकारल्याप्रकरणी तिघांना जिल्हा न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## स्विमिंग पुलावरून पडून चिमुकल्याचा मृत्यू

**रायगड** : कोकणात सध्या पर्यटक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. अनेक रिसॉर्ट समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलले आहेत. मात्र. अशातच दिवेआगर परिसरात एका छोटया मुलाचा रिसॉर्टच्या स्वीमिंग पुलमध्ये पडून त्याचा दुर्दैवीरीत्या मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेचा आता व्हिडिओ समोर आला आहे. आविष्कार येळवंडे असे या चिमुकल्याचे नाव आहे वडिलांची नजर चुकवून हा चिमुकला स्विमिंग पूकडे गेला होता यावेळी ही दुर्घटना घडली आहे.

## जिवे मारण्याचा प्रयत्न

**रायगड** : रायगड जिल्ह्यात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे हद्दीत गोळीबार झाल्याच्या प्रकरणानंतर आता आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चांढवे बुद्रुक येथे पोलादपूर तालुक्यातील धारवली येथील युवक संशयित आरोपी प्रथम संतोष सकपाळ (वय वर्षे २१) याने व संशयित सात सहकारी आरोपींनी मागील वादाचा राग मनात धरून चांढवे बुद्रुक गावात चाकूने सपासप वार करत तीन जणांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

## ‘५०चा आकडाही पार करू शकणार नाही’

**मुंबई** : गेल्या २५ वर्षांत मुंबईकरांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाला आणि त्यांच्या शिवसेनेला प्रत्येक निवडणुकीत नाकारले. कायम घरचा रस्ता दाखवला. आमच्या समर्थनामुळे तुमचे आकडे खाली जात असतानाही तुम्ही खुर्च्या टिकवून होता, कारण हिंदुत्वासाठी आम्ही तुम्हाला समर्थन देत होतो.

आता परिस्थिती बदलली आहे. उद्धव ठाकरेंची शिवसेना येणाऱ्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत ५०चा आकडाही पार करू शकणार नाही, असा दावा मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी केली.

## कोश्यारी हे महाराष्ट्राचे गुन्हेगार : राऊत

**मुंबई** : महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल सर्वोच्च न्यायालयानं दिला आणि सोबतच राज्यपालांचं कृत्य हे चुकीचं असल्याचं म्हणत ताशेरे ओढले. त्यानंतर राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रिया आल्या. आता पुन्हा एकदा संजय राऊत यांनी भगतसिंह कोश्यारी यांच्यावर निशाणा साधला आहे. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे महाराष्ट्राचे गुन्हेगार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

# समीर वानखेडेंचा पाय आणखी खोलात

## सीबीआयकडून चौकशी सुरु, आता निलंबनाची टांगती तलवार

सुराज्य/मुंबई

**भ्रष्टाचार आणि बेहिशेबी मालमत्ताप्रकरणी अडचणीत सापडलेले एनसीबीचे तत्कालीन विभागीय संचालक समीर वानखेडे यांच्यावर कारवाईची शक्यता आहे. सीबीआयमध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्याने वानखेडे यांच्यावर निलंबनाची कारवाई होणार असल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम दिलासा दिल्यामुळे वानखेडे शनिवारी सीबीआयच्या चौकशीला सामोरे गेले. सुमारे पाच तासांच्या चौकशीमध्ये आर्यन खान प्रकरण आणि उत्पन्नाच्या स्रोतांबाबत त्यांच्याकडे विचारणा करण्यात आल्याची माहिती सीबीआयमधील सूत्रांनी दिली.**

आर्यन खान ड्रग्ज प्रकरणात लाचखोरीचे आरोप झाल्यानंतर एनसीबीच्या दक्षता समितीने विभागीय चौकशी सुरू केली. या चौकशीत वानखेडे यांच्यासह तत्कालीन अधीक्षक विश्व विजय सिंग, गुप्तचर अधिकारी आशीष रंजन यांच्यासह के. पी. गोसावी आणि सॅनविल यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आणि याबाबत गुन्हा दाखल करण्यासाठी सीबीआयकडे तक्रार करण्यात आली. तक्रारीमध्ये दक्षता समितीने त्यांचा अहवाल सादर केला आहे. वानखेडे आणि इतरांनी हा कट कसा रचला याबद्दलची माहिती यामध्ये आहे. त्यावरून सीबीआयने गुन्हा दाखल करीत पुढील प्रक्रिया सुरू केली. तत्पूर्वी विभागीय चौकशी सुरू असतानाच वानखेडे यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने त्यांना दिलासा देत प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाकडे पाठविले.

मुंबई उच्च न्यायालयात वानखेडे यांच्यावतीने आर्यन खान प्रकरणात लाचखोरी आणि खंडणीचे आरोप फेटाळून लावण्यात आले. यासाठी दिलेल्या पुराव्यात त्यांनी शाहरूख खान याच्यासोबतचे संभाषणही सादर केले. न्यायालयाने त्यांना अटकपासून संरक्षण देत सीबीआयच्या चौकशीला सामोरे जाण्याचे निर्देश दिले. सीबीआयच्या वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथील कार्यालयात सकाळी साडेदहाच्या सुमारास वानखेडे पोहोचले. एनसीबीच्या दक्षता समितीने नोंदविलेले आक्षेप, समीर वानखेडे यांनी न्यायालयात मांडलेली बाजू, उत्पन्नाचे स्रोत, शाहरूखसोबत झालेले संभाषण या तसेच अन्य काही मुद्द्यांवर वानखेडे यांना प्रश्न विचारण्यात आले. सायंकाळी साडेचारच्या सुमारास ते सी

चौकशीला जाताना मी लढणार, सत्यमेव जयते’, अशी प्रतिक्रिया



वानखेडे यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना दिली. विभागीय चौकशीत दक्षता समितीने ठपका ठेवला आणि त्याआधारे सीबीआयने गुन्हा दाखल केला असल्याने वानखेडे यांचे निलंबन होण्याची दाट शक्यता आहे.

वानखेडे यांना अटक झाली नसली तरी विभागीय चौकशीच्या आधारे ते सध्या कार्यरत असलेले केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ याबाबत निर्णय घेऊ शकते, असेही म्हटले जात आहे.


---

# अहमदनगरमधील दंगलीवरून शरद पवारांचा हल्लाबोल

सुराज्य/अहमदनगर

अहमदनगरमध्ये काही शक्ती धर्माच्या नावाने अंतर वाढवून दंगली घडवत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला. यावेळी त्यांनी कर्नाटकचं उदाहरण देत तेथेही त्या लोकांनी सत्तेचा वापर करून द्वेष पसरवल्याचा आरोप करत जनतेने त्यांना धडा शिकवल्याचं नमूद केलं आणि भाजपावर हल्लाबोल केला. तसेच कर्नाटकात होऊ शकतं, तर देशातील कोणत्याही राज्यात होईल यासाठी प्रयत्न करणं आपली जबाबदारी असल्याचं मत व्यक्त केलं. ते रविवारी (२१ मे) अहमदनगरमध्ये बोलत होते.

शरद पवार म्हणाले, ‘धर्माच्या नावाने अंतर



वाढवलं जात आहे. हा नगर जिल्हा पुरोगामी जिल्हा म्हणून ओळखला जातो. अनेक ऐतिहासिक काम करणारे मान्यवर या जिल्ह्यात होऊन गेले. याच नगर जिल्ह्यात शेवगावला दोन ते तीन दिवस बाजारपेठ बंद होती.’

## नव्या संसद भवनाचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते करावे : राहुल गांधी

सुराज्य/नवी दिल्ली

नवीन संसद भवनाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. वीर सावरकर यांच्या जयंतीदिनी २८ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या नव्या संसदेचे उद्घाटन करणार आहेत.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी २८ मे रोजी पंतप्रधान मोदींच्या हस्ते संसद भवनाच्या उद्घाटनाबाबत माहिती दिली होती. यावरून आता राजकारणही तीव्र झाले आहे. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी ट्विट करून सरकारला घेरले आहे.

## पुणेकरांना आयपीएलचे असेही फिव्हर

### फ्लॅटमध्ये पोलिसांनी छापा टाकताच चक्रावले

सुराज्य/पुणे

देशात इंडियन प्रीमियर लीग म्हणजे (आयपीएल) चं फिव्हर मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. यामध्ये आता आयपीएल अखेरच्या टप्प्यात आल्याने क्रिकेट प्रेमींची धाकधूक वाढू लागली आहे. मात्र, याबरोबर सट्टा लावण्याचं प्रमाणही वाढू लागलं आहे. पुण्यातल्या धनश्री सिम्रेचर सोसायटी, साईबाबा नगर, कोंढवा इथं एका फ्लॅटमध्ये क्रिकेटबेटिंग करणाऱ्या ३ आरोपींना गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने अटक केली आहे.

याप्रकरणी वसीम हनीफ शेख रा. कोंढवा, इक्रमा मकसुद मुल्ला रा. घोरपडी पेठ, मुसाबित मेहमुद बाशाइब रा. सोमवार पेठ अशी या आरोपींची नावे आहेत. खंडणी विरोधी पथकाने या आरोपींना अटक केली असून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची अधिक माहिती अशी आहे की, आयपीएलचा सट्टा मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

## उद्धव ठाकरेंच्या कर्जतमधील फार्महाऊसमध्ये २ हजारांच्या नोटा

सुराज्य/मुंबई

२ हजारांच्या नोटा चलनातून बाद करण्यात आल्याची घोषणा १९ मे रोजी करण्यात आली. त्यानंतर यावर अनेक राजकीय प्रतिक्रिया उमटल्या. अनेकांकडून या निर्णयावर टीका करण्यात आली. ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी नोटबंदीवरुन मोदी सरकारला घेरले आता यावर नितेश राणे यांनी राऊतांना प्रतिप्रश्न करत, ठाकरेंवर गंभीर आरोप केला आहे.

भाजप आमदार नितेश राणे म्हणाले की, ‘२ हजारांच्या नोटा बंद झाल्यानं यांना मोठा झटका बसला आहे. कारण ठाकरेंच्या कर्जतमधील फॉर्महाऊसमध्ये दोन हजारांच्या नोटा लपवून ठेवण्यात आल्या आहेत, असं म्हणत नितेश राणे यांनी गंभीर आरोप केला आहे.’

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप नेत्यांवर टीका करण्यापेक्षा तुझ्या मालकाने नंदकिशोर चतुर्वेदीकडे किती काळा पैसा



ठेवला आहे, याचा हिशोब दे. ज्यादिवशी नंदकिशोरी चतुर्वेदी भारतात येईल आणि सत्य सांगेल ज्यादिवशी तो माहिती देईल तेव्हा कळेल की काळ्या पैशांचा सर्वात मोठा दलाल हा कलानगरमध्येच बसला आहे, असा आरोप राणेंनी ठाकरेंवर केला आहे.

कोविड काळात केलेला भ्रष्टाचार, महाविकास आघाडी सरकारच्या काळात उकळलेले पैसे आणि सामनात जाहिरातींच्या नावांवर केलेला भ्रष्टाचार याचा पैसा ठेवायचा कुठे? असा प्रश्न आता ठाकरेंना पडत आहे. इतकचं काय तर युवासेनेतून तिकिट देण्यासाठी २ करोड रुपये घेतले जात आहेत, असा घणाघातही राणेंनी यावेळी केला.

# ‘राजीनामा देतो, फक्त एक काम करा’

## आदित्य ठाकरेंचे मुनगंटीवार यांना ‘थांबा आव्हान’...

सुराज्य/मुंबई

‘राज्य सरकारविरोधात जनमत आहे असे वाटत असेल तर आमदारकीचा राजीनामा देऊन निवडणुकांना सामोरे जा’, असे आव्हान देणाऱ्या सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना आता माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनीही प्रतिआव्हान दिले आहे. मी राजीनामा देतो, पण निवडणुकीत माझ्याविरोधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उभे करा’, असे त्यांनी म्हटले आहे.

मुंबईत फुटबॉल वर्कशॉपच्या उद्घाटनासाठी आदित्य यांनी उपस्थिती लावली होती. त्यावेळी त्यांनी मुनगंटीवार यांना हे प्रतिआव्हान दिले. निवडणुकांना सामोरे जाण्याबाबत तुम्ही आम्हाला काय सांगताय; तुमच्या शिल्लक आमदारांना राजीनामा द्यायला सांगा. पाहिजे तर तुम्ही वरळी विधानसभेत राजीनामा द्या, तिथेच आपण पहिली चाचणी करून घेऊ. पोपट मेला आहे की जिवंत आहे, याची चाचणी सर्वप्रथम तिथेच करू’, असे मुनगंटीवार म्हणाले होते. त्याला प्रत्युत्तर देताना आदित्य यांनी हे आव्हान स्वीकारल्याचे सांगितले. घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांना माझ्याविरोधात उभे करणार असाल, तर आताच राजीनामा देतो. चला तयारी आहे का’, असा प्रश्न त्यांनी केला. तसेच, सरकारमध्ये मुनगंटीवार यांचे कोणी ऐकत नाही’, असा चिमटाही आदित्य यांनी काढला.






## पंतप्रधानांची लोकप्रियता वाढली

नवी दिल्ली : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता दरवर्षी वाढतच आहे. अमेरिकन फर्म मॉर्निंग कन्सल्टने केलेल्या सर्वेक्षणानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता इतर कोणत्याही नेत्यापेक्षा जास्त वाढली असल्याचे समोर आले आहे. या सर्वेक्षणात पंतप्रधान मोदी हे अव्वल स्थानावर असून त्यांचे रेटिंग %८ टक्के आहे. त्यापाठोपाठ स्विस राष्ट्राध्यक्ष ॲलेन बेर्सेट, मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष आंद्रेस मॅन्युएल लोपेझ ओब्राडोर आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांचा क्रमांक लागतो. दोन महिन्यांपूर्वीच्या सर्वेक्षणात मोदींचे रेटिंग %६ टक्के होते. अमेरिकन फर्म मॉर्निंग कन्सल्टने जागतिक नेत्याबाबत सर्वेक्षण केले होते. या सर्वेक्षणात २२ देशांच्या राष्ट्रप्रमुखांचा समावेश आहे. जपानमधील हिरोशिमा येथे होणाऱ्या जी-% (ऋ-%) शिखर परिषदेत यावेळी फारसे लोकप्रिय नसलेल्या नेत्यांची संख्या अधिक असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे. मात्र, लोकप्रिय नेत्यांच्या यादीत पंतप्रधान मोदी पहिल्या क्रमांकावर असल्याचे या सर्वेक्षणाची निष्कर्ष आहे.

# महाराष्ट्राची ‘हास्यजत्रा’ला लागणार ब्रेक

सुराज्य/मुंबई

**छोट्या पडद्यावरील ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ हा कार्यक्रम घराघरात लोकप्रिय आहे. गेले अनेक महिने हा कार्यक्रम प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करत आला आहे. हा कार्यक्रम अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस पडला. अनेक कलाकारांना या कार्यक्रमाने नवी ओळख दिली. या कार्यक्रमातील सर्व कलाकारांना प्रेक्षकांचं नेहमीच भरभरून प्रेम मिळत असतं. परंतु आता हा कार्यक्रम काही काळासाठी प्रेक्षकांची रजा घेणार आहे.**

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’मधील कलाकारांचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. या सर्वांच्या उत्स्फूर्ततेचं आणि विनोदाचं प्रेक्षक नेहमीच कौतुक करत असतात. हे सर्व कलाकारदेखील सोशल मीडियावर सक्रिय राहून त्यांच्या व या कार्यक्रमाच्या पडद्यामागे घडणाऱ्या गोष्टी चाहत्यांशी शेअर करत असतात. आता या कार्यक्रमातील कलाकारांनी काही फोटो शेअर करत हा कार्यक्रम काही काळासाठी ब्रेक घेणार असल्याचं सांगितलं.

या कार्यक्रमातील प्रियदर्शनी इंदलकर, रसिका वेंगुर्लेकर, गौरव मोरे अशा अनेक कलाकारांनी इन्स्टाग्रामवर या कार्यक्रमाच्या शूटिंगच्या शेवटच्या दिवसाचे काही क्षण शेअर केले. फोटो पोस्ट करत प्रियदर्शनीने लिहिलं, दोन महिन्यांनंतर भेटू तर रसिका वेंगुर्लेकर म्हणाली, शेवटच्या शेड्युलचा शेवटचा दिवस या माझ्या अतरंगी मित्रांबरोबर शेवटचे काही क्षण हे फोटो पाहिल्यावर रसिकाच्या चाहत्यांचा असा समज झाला की, हा कार्यक्रम प्रेक्षकांचा कायमचा निरोप घेणार आहे.

तर त्यानंतर तिने या सेटवरील एक फोटो पोस्ट करत लिहिलं, काळजी करू नका हा कार्यक्रम बंद होत नाहीये. आम्ही ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ची संपूर्ण टीम छोटीशी सुट्टी घेत आहोत. आम्ही लवकरच पुन्हा तुमच्या भेटीला येऊ.

या सर्व कलाकारांनी शेअर केलेले हे फोटो सध्या खूप चर्चे




त आले आहेत. हे सर्व कलाकार पुन्हा त्यांच्या भेटीला कधी येणार याची आता चाहते वाट बघत आहेत.

## धाराशिवमधील बँकेत कोट्यवधींचा घोटाळा

सुराज्य/धाराशिव

धाराशिव येथील सहकारी बँकेत कोट्यवधींचा घोटाळा झाल्याची माहिती समोर आली आहे. ५ कोटी ४६ लाख १२ हजार रुपयांचा अपहार व फसवणूक प्रकरणी धाराशिव जनता सहकारी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, संचालक मंडळ व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विरुद्ध धाराशिव शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२८ सप्टेंबर २००५ ते ३१ मार्च २००८ दरम्यान धाराशिव जनता सहकारी बँकेचे तत्कालीन चेरमन, संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संगनमत करुन नियमबाह्य पद्धीने बॉण्ड खरेदी केले. हे करताना त्यानी नोएडा टोला ब्रीज कंपनी लिमिटेड ही कंपनी दिवाळखोरीत असताना व त्या कंपनीची पडताळणी केली नाही.




# बाजार समितीमध्ये दिसणार 'टशन'

# भाजपचे तिन्ही आमदार एकत्र येणार माने-हसापुरे एकदिलाने लढणार का?

*महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीच्या अगोदरच सोलापूर बाजार समितीच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोलापूर शहर उत्तर, दक्षिण, अक्कलकोट आणि मोहोळ या चारही विधानसभा मतदारसंघात बाजार समितीच्या निवडणुकीचा परिणाम होतो, असे आजपर्यंतचे चित्र आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बाजार समितीच्या या निवडणुकीत भाजपचे तिन्ही आमदार म्हणजे विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी एकत्र येतात का आणि दुसरीकडे माजी आमदार दिलीप माने आणि सुरेश हसापुरे हे सहकारातील नेते यंदा तरी एक दिलाने निवडणूक लढवतात का आणि यांच्यात कोणत्या वाटाघाटी होतात? याकडे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे. त्यामुळे यंदा बाजार समितीत जाण्यासाठी सर्वांमध्ये जोरदार 'टशन' दिसणार हे नक्की.*

**अजित उंब्रजकर**

पुढील महिन्यात बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक संपणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया जवळपास सुरू करण्यात आली आहे. गत निवडणुकीत तत्कालीन सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्याविरुद्ध दिलीप माने यांनी सर्वपक्षीय मोट बांधली होती. माने- देशमुख यांच्या या लढाईत माने गटाने बाजी मारली होती. विशेष म्हणजे भाजपचे आमदार विजयकुमार देशमुख हे माने गटात सहभागी झाले होते. सुरुवातीला दिलीप माने हे बाजार समितीचे सभापती झाले. मात्र त्यानंतर विजयकुमार देशमुख सभापती झाले आणि ते आजपर्यंत आहेत. त्यामुळे विजयकुमार देशमुख यांना आपल्या गटात सामावून घेणे हे माने यांना महागात पडल्याचे दिसून आले. आता पुन्हा एकदा बाजार समितीची निवडणूक तोंडावर आली आहे. आमदार सुभाष देशमुख पुन्हा एकदा निवडणूक जिंकून मागच्या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी सज्ज झाले आहेत. यंदा त्यांना जिल्हाध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याशेट्टी यांची साथ मिळणार आहे. दुधनी आणि अक्कलकोट बाजार समितीवर आमदार कल्याणशेट्टी यांनी दणदणीत विजय मिळवला होता. सोलापूर बाजार समितीमध्ये अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील अनेक सोसायटी आणि गावांचा समावेश असल्यामुळे सचिन कल्याणशेट्टी यंदा सोलापूर बाजार समितीमध्येही लक्ष देणार हे जवळपास निश्चित झाले आहे. मध्यंतरी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दौऱ्यात आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख यांनी एकीचा नारा दिला होता. त्यामुळे यंदा आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासोबत आमदार विजयकुमार देशमुख हे तिन्ही आमदार एकत्र येऊन बाजार समिती निवडणूक लढवणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

या निवडणुकीत सर्वात महत्त्वाचा फॅक्टर म्हणजे दिलीप माने आणि सुरेश हासापुरे हे एकमेकांसोबत कसे जुळवून घेणार हेही पाहणे मजेशीर ठरणार आहे. मागच्या वेळेस दिलीप माने गटाच्या दोन जागा वगळता सर्व जागा निवडून आल्या होत्या. यापैकी एका जागेवर सुरेश हसापुरे यांचा पराभव झाला होता. हा पराभव जाणीवपूर्वक झाल्याची चर्चा सर्वत्र आजही होत आहे. त्यामुळे यंदा सुरेश हसापुरे हे सावध पावले टाकत असल्याचे दिसत आहेत. सद्यस्थितीत उत्तर आणि दक्षिण मधील सोसायट्यांचा विचार करता दिलीप माने आणि सुरेश हसापुरे यांचे जवळपास ११४ सोसायट्यांवर वर्चस्व आहे. त्यामुळे या दोघांनी एकत्रित या निवडणूक मनापासून लढवली तर विजय सोपा जाईल, असे सध्यातरी बोलले जात आहे.

दुसरीकडे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दिलीप माने यांच्यासह सर्वपक्षीय मोट बांधली जाणार असल्याची चर्चा आहे. मात्र गत विधानसभा निवडणुकीत दिलीप माने यांनी आमदार प्रणिती शिंदे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती त्यामुळे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, दिलीप माने यांच्या बाबतीत काय भूमिका घेतात याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. सुरेश हसापुरे हे सुशीलकुमार शिंदे यांच्या जवळचे मानले जात आहेत. त्यामुळे सुशीलकुमार शिंदे बाजार समितीच्या निवडणुकीबाबत हसापुरे यांचा सल्ला घेणार, असे चर्चिले जात आहे. त्यामुळे या संपूर्ण निवडणुकीत दिलीप माने यांच्या सोबत सुरेश हसापुरे यांचीही भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.



### माने यांना आ. देशमुख डोईजड

गत निवडणुकीत विजयकुमार देशमुख हे माने गटाकडून लढले होते. मात्र एकही सोसायटी नाही. एकही पंचायत समिती नाही. तरी आ. देशमुख हे डोईजड झाल्याचे आमदार दिलीप माने यांना पटले आहे. त्यामुळे आमदार दिलीप माने आता विजयकुमार देशमुख यांच्यासोबत काय भूमिका घेतात हेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.




### हसापुरे यांची सावध चाल

दक्षिण तालुक्यातील ८४ पैकी जवळपास ६० सोसायट्यांवर हसापुरे यांचे वर्चस्व आहे. नुकत्याच काही महिन्यांपूर्वी हसापुरे यांनी सर्व सोसायट्यांच्या संचालकांचा सत्कार टाकळीकर मंगल कार्यालय येथे केला होता. यावेळेस त्यांनी मोठे शक्ती प्रदर्शनही केले होते. त्यामुळे जनता आपल्यासोबत असते मात्र नेते गंमत करतात हे आता हसापुरे यांनाही उमगले आहे. त्यामुळे हसापुरे आता सावध आणि चतुराईने पावले टाकत आहेत.

# विरोधकांची एकी सत्ताधाऱ्यांना पडणार का भारी ?

**संजय पाटील**

माळशिरस तालुक्यात नुकतीच अकलूज कृषी उत्पन्न बाजार समीतीची निवडणूक झाली. या निवडणुकीत सत्ताधारी मोहिते-पाटील गटाने १७ जागा जिंकल्या तर विरोधी गटाचे उत्तमराव जानकर हे विजयी झाले. बाजार समीतीत पहिल्यांदाच विरोधी गटाचा संचालक निवडून आला. विरोधकांचा पराभव झाला असला तरी त्यांनी घेतलेली मते सत्ताधारी गटाला आत्मचिंतन करायला लावणारी बाब आहे. अकलूज बाजार समितीमध्ये तालुक्यातील मोहिते-पाटील विरोधकांमधील झालेली गटबाजी संपुष्टात आल्याचे दिसून आले. यापुढील सर्वच निवडणुका एकदिलाने लढविणार असल्याचे ठरविले. यामध्ये माजी जि.प. अध्यक्ष फत्तेसिंह माने - पाटील, पद्मजादेवी मोहीते पाटील, प्रकाश पाटील, राजकुमार पाटील, रामदास देशमुख, उत्तमराव जानकर, सोमनाथ वाघमोडे, शंकर देशमुख, माणिक वाघमोडे, के. के. पाटील, गौतम माने, अप्पासाहेब वाघमोडे, नागेश काकडे, दादाराजे घाडगे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अजित बोरकर, शिवसेनेचे नामदेव वाघमारे यांच्यासह तालुक्यातील सर्व विरोधक या निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आल्याचे दिसून आले. गत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विरोधकामधे गटबाजी झाल्यामुळे मोहिते पाटील यांनी सहजासहजी सत्ता मिळविली. मात्र पुन्हा एकदा विरोधकांनी आप आपसातील मतभेद बाजूला ठेवून आगामी सर्व निवडणुका एकदिलाने लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. ही एकी टिकली तर विरोधक सत्ताधारी मोहिते पाटील गटाला भारी पडेल का? हे पाहणे औस्तुकयाचे ठरेल.

# रोहित पवार इतिहास विसरताहेत; दिशाहिन होताहेत



*- इतिहास विसरलेली माणसे दिशाहीन भरकटत असतात. यासाठी इतिहास माहित असला पाहिजे आणि त्यानुसार वाटचाल केली पाहिजे पण आमदार रोहित पवार हे सध्या इतिहास विसरलेले दिसत आहेत. त्यामुळे ते कधी काँग्रेसला अंगावर घेताना दिसत आहेत तर कधी भाजपाला. त्यामुळे त्यांच्या बुद्धीची चर्चा सध्या सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय रणांगणात रंगताना दिसत असून यामुळे पवार घराण्याला नामुष्कीला सामोरे जावे लागताना दिसत आहे.*

**डी.एस.गायकवाड**

मुळात सोलापूर जिल्ह्यातील मोहिते- पाटील आणि सुशीलकुमार शिंदे हे राज्याबाहेर देखील चर्चेत असणारी राजकीय घराणी समजली जातात. या घराण्यांचे योगदान महाराष्ट्राने कधीही नाकारले नाही. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्यानंतर विजयसिंह मोहिते पाटील आणि सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या कर्तृत्वाची छाप राज्यावर पाडली. राज्याच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले पण रोहित पवार मात्र सध्या भलतेच भरकटलेले दिसत आहेत. मध्यंतरी त्यांनी सोलापूर जिल्हा लोकसभा मागून विनाकारण काँग्रेसला डिवचण्याचा प्रयत्न केला. यावर आमदार प्रणिती शिंदे यांच्याकडून त्यांना कोण रोहित पवारघ? अशी बोलणी खावी लागली. त्यावेळी त्यांची खिल्ली उडवण्यात आली. आता तर आ.पवार हे मोहिते पाटील यांनाच आव्हान देत अंगावर घेताना दिसत आहेत. मुळात मोहिते पाटील परिवाराचा इतिहास त्यांना माहीत नसावा, पण मोहिते पाटलांच्याच कारखान्यात आ.रोहित यांचे आजोबा आप्पासाहेब पवार कामाला होते. जेव्हा शरद पवार राजकारणात नव्हते त्यावेळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील इंदिरा काँग्रेस पक्षाचे पूर्ण देशाचे खजिनदार होते. विजयसिंहांचा दरारा राज्याच्या राजकारणात इतका होता कि, त्यांच्या राष्ट्रवादी प्रवेशासाठी पश्चिम महाराष्ट्र कान लावून बसला होता. अनेक नेत्यांचे कार्यकर्त्यांचे प्रवेश हे विजयदादांच्या निर्णयावर अवलंबून होते आणि विजयदादांनी प्रवेश केल्यामुळेच राष्ट्रवादीचा डोलारा वाढला. रणजितसिंह मोहिते पाटील हे युवकचे प्रदेशाध्यक्ष असताना त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आणि राष्ट्रवादी पक्ष तळागाळात पोहोचवण्याचे मोलाचे कार्य केले. त्यामुळे आ.रोहित पवार हे ज्या राष्ट्रवादी पक्षाचे नेते म्हणून मिरवत आहेत. त्या पक्षाची पायाभरणीच मोहिते -पाटील यांनी केली आहे. हे ते सध्या विसरताना दिसत आहेत. मोजकेच बोलणे आणि त्या माध्यमातून आपली विश्वासार्हता टिकवणे ही परंपरा आजपर्यंत पवार घराण्याची राहिली आहे पण या घराण्याला रोहित पवार यांच्याकडून टाळे लावले जात आहेत.

### मोहिते-पाटील, शिंदेंनी नेहमीच शांततेला महत्व दिले

इतर जिल्ह्याचे राजकारण वेगळे आणि सोलापूर जिल्ह्याचे राजकारण वेगळे, अशी परिस्थिती आहे. इथे नेतृत्वात जितकी शांतता तितकाच, तो पक्ष आणि नेतृत्व जनतेच्या मनात घर करत जातो. मोहिते पाटील, शिंदे आणि सोलापूर जिल्ह्यातील सर्वच राजकीय घराणे यांनी नेहमीच संयमाला महत्त्व दिले आहे. त्यामुळेच या जिल्ह्यात टोकाची टीकाटिपणी ऐकायला मिळत नाही पण हा सल्ला आता आमदार रोहित पवार यांना कोणीतरी दिला पाहिजे.

### जिल्ह्याचा नेता बनण्याचा प्रयत्न..

जिल्ह्यात राष्ट्रवादीला जबाबदारी स्वीकारेल, असा नेता उरला नाही. त्यामुळे आपणच या विभागाचे नेतृत्व करावे. या प्रयत्नात आ.पवार दिसत आहेत. यातूनच त्यांनी आदिनाथ कारखान्याचा प्रयोग केला मात्र तो फेल गेला. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मात्र सोलापूर जिल्ह्यामध्ये स्वतःचा गट निर्माण करीत जिल्ह्यात आपले राजकीय अस्तित्व तयार केले. याच प्रयत्नात आ.पवार दिसत आहेत आणि यासाठीच त्यांची धडपड चालू असलेली दिसते. त्यातूनच अशी वादग्रस्त वक्तव्ये करून जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे आपणच तारणहार आहोत, असे दाखवण्याचा त्यांचा केविलवाणा प्रयत्न दिसत आहे.

# सहकार शिरोमणीच्या निवडणुकीत काळेंसमोर स्वकीयांसह विरोधकांचे आव्हान

*सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेपासून कल्याणराव काळे यांचे वर्चस्व कारखान्यावर अबाधित राहिले आहे. गेली २३ वर्ष कल्याणराव काळे कारखान्याचे चेअरमन आहेत. मात्र पहिल्यांदाच कारखान्याची निवडणुकीत चुरस पाहायला मिळत आहे. परिवार, नातेवाईक आणि विरोधकांचे मोठे आव्हान कल्याणराव काळे यांच्यासमोर असणार आहे.*

**सूरज सरवदे**

कारखाना निवडणुकीपूर्वीच विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक आणि कल्याणराव काळे यांचे सावत्र बंधू समाधान काळे यांनी बंडाचे निशाण पेटवले होते. काळे गटात होणारी घुसमट समाधान काळे यांनी जाहीररित्या व्यक्त केली होती. युवकांच्या भावना जाणून घेण्यासाठी त्यांनी गाव भेट दौरे देखील केले होते. मात्र अडचणीच्या काळात साथ सोडून जाणे आणि निवडणुकीनंतर अपेक्षित निकाल न लागल्यास त्याचे खापर आपल्यावर फुटू नये, या भावनेतून समाधान काळे यांनी आपले बंड थंड केले.

कल्याणराव काळे यांचा कारखाना म्हणजे त्यांचं स्वतचं आणि नातेवाईकांचे साम्राज्य होते. उसाला दर न देणे, कामगारांच्या पगारी न देणे, ऊस वाहतूक तोडणीदारांची देणे न देणे या अशा गोष्टींमुळे जवळचे नातेवाईक देखील दुखावले आणि दुरावले. दीपक पवार, नंदकुमार बागल, धनंजय काळे, बाबा काळे यासह अनेक नातेवाईकांनी कल्याणराव काळे यांच्यापासून फारकत घेत कल्याणराव काळे यांच्या विरोधात आता रान पेटवले आहे.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर सत्ता काबीज केल्यानंतर सहकार शिरोमणी वसंतराव सहकारी साखर कारखान्यावर सत्ता काबीज करण्यासाठी अभिजीत पाटील आणि डॉ बी.पी रोंगे यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या मागील आणि चालू गळीत हंगामातील ऊस बिले देऊन अभिजीत पाटील यांनी सहकार शिरोमणीचे रणशिंग फुंकले आहे. अभिजीत पाटील गटाने मोठे शक्ती प्रदर्शन करत हजारो सभासदांना एकत्रित आणून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.






### निवडणूक चुरशीची होणार

एकंदरीत पहिल्यांदाच सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची निवडणूक ही अत्यंत चुरशीने होत आहे. दीपक पवार नंदकुमार बागल, धनंजय काळे अशा जवळच्या नातेवाईकांनी कल्याणराव काळे यांच्या विरोधात रान उठवले आहे. अभिजीत पाटील यांनी डॉ. बी.पी. रोंगे यांनी निवडणुकीत जोर झाल्यामुळे ही निवडणूक चुरशीची झाली आहे.